# आमचे जाहीरनामे

वरुण भिडे | राजेंद्र पटवर्धन | वामन शेणॉय | फु. भि. सांकला

बुधवार
१३ जानेवारी १९७१
चाळीस पैसे

# माणूस



बुधवार, १३ जानेवारी १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : बावन्नावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

□ दि. २६ डिसेंबरच्या अंकातील 'श्री. चारी'वरील प्रभाकर पेंढारकरांनी लिहिलेला सुरेख लेख वाचला. खरोखर इतक्या चांगल्या, प्रामाणिक व्यक्तींची महती त्यांच्या निधनानंतरच आम्हाला कळावी हे आमचे दुर्दैव. प्रभाकर पेंढारकरांनी एकाद्या छोटया अनुबोधपटाप्रमाणेच सदर लेख लिहिला आहे.

त्याचप्रमाणे दि. ३० डिसें. च्या अंकातील 'एका नक्षलवाद्याचा जन्म' ही निवेदनवजा कथा आवडली. सदर अंकातील स्काउट-चळवळीवरील लेखाबद्दल श्री. वरूण भिडे यांचे अभिनंदन. कारण त्यांनी सर्वसामान्य लोकांना माहीत नसलेल्या एका फालतू चळवळीबद्दल योग्य तेच लिहिले आहे. त्यात त्यांनी टीका केलेल्या गोष्टी संपूर्णपणे खऱ्या आणि तितक्याच अनावश्यक आहेत हे मी एक माजी स्काउट या नात्याने नमूद करू इच्छितो. मी लहानपणी सुमारे पाच वर्षे सदर चळवळीत भाग घेतला होता. त्यावेळी काही वाटत नसे. परंतु आता मोठेपणी मात्र तो एक आमचा मूर्खपणा होता असे प्रामाणिकपणे वाटते. म्हणूनच श्री. वरूण भिडे यांच्या लेखातील विचार तंतोतंत माझ्या विचाराशी जुळणारे आढळले व त्यांनी लिहिल्याप्रमाणे सदर खुळचट imported चळवळीची आपल्या देशातून त्वरित हकालपट्टी व्हावी असे मलादेखील वाटते.

४ जानेवारी, १९७१ — शशिकांत कोचीकर, मुंबई

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

अरुण गोसावी

# चर्चा... बैठकी....अंदाज

इतके दिवस वाट पाहिल्यानंतर अखेर लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकांच्या घंटा आता वाजू लागल्या आहेत. निवडणुका होणार याची सर्वच पक्षांना खात्री होती. पण केव्हा हाच प्रश्न होता. आणि त्या केव्हाही आल्या तरी आपण बेसावध असता कामा नये म्हणून सर्व पक्ष कसोशीने तयारीला लागले होते.

लोकसभेला जोडून महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका घेण्याविषयीची टूम मध्येच कशी उठली होती कुणास ठाऊक. पण त्यामुळे महाराष्ट्रात थोडाच वेळ का होईना पण जोरदार वादळ उडाले. नागपूरला विधानमंडळाचे अधिवेशन चालू आहे. तेथून यासंबंधीच्या बातम्या येऊ लागताच मुंबई-पुण्यात गडबड उडाली. नागपूरलाही आमदारात मोठीच धावपळ सुरू झाली. कारण निवडणुकांचे प्रयोजन काय ? महाराष्ट्र विधानमंडळात नव्या काँग्रेसला प्रचंड बहुमत आहे. असे असताना स्वतःहून विधानसभा बरखास्त करून आपल्याच पायावर धोंडा काय म्हणून पाडून घ्यायचा ?

महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष श्री. वसंतरावदादा पाटील आणि मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्यामधील मतभेद कर्मचारी संपाच्यावेळी स्पष्ट झाले होते. परवा विधानसभा बरखास्त करण्याच्या शक्याशक्यतेविषयीच्या बातम्या नागपूरहून येऊ लागल्या तेव्हा ते चांगलेच गरम झाले. त्यांनी आपला विरोध ताबडतोब नोंदविला. इथे यशवंतराव चव्हाण आले होते त्यांच्याही कानावर घातला. जास्त भानगड नको म्हणून चव्हाणांनी पुण्याहून भाषण करून महाराष्ट्र विधानसभेच्या मध्यावधी निवडणुका घेण्याची गरज नसल्याचे सांगून टाकले.

महाराष्ट्राप्रमाणे इतर राज्यातही विधानसभांच्या निवडणुका घेण्याविषयी जी चर्चा चालू होती त्यावर आता प्रधानमंत्र्यांनी कायमचा पडदा टाकला आहे. इंडिकेट काँग्रेस ज्या राज्यामध्ये सत्तेवर आहे त्या राज्यात तरी मध्यावधी निवडणुका होणार नाहीत असे त्यांनी जाहीर केले आणि नागपूर-मुंबईत चाललेली चर्चा थडावली. या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेची तातडीची बैठकही बोलाविली होती म्हणे.

लोकसभेच्या निवडणुका होणार हे पक्के झाल्यावर सर्व पक्षाचे दंड थोपटणे

सुरू झाले आहे. पक्षा-पक्षांची बोलणी होण्याच्या अगोदरच प्रत्येक पक्ष आपण एकट्यानेच लोकसभेच्या सर्व जागा लढविणार असल्याचा आविर्भाव आणू लागला आहे. निवडणूक आघाड्या अपरिहार्य आहेत. पण आघाड्यांसाठी बोलणी करण्यापूर्वी आपल्या ताकदीचे प्रदर्शन करण्याचा हा प्रयत्न. मध्यावधी निवडणुका जाहीर होताच पहिल्याच झटक्यात जुनी काँग्रेस, नवी काँग्रेस, जनसंघ आणि शिवसेना यांनी आपण मुंबईच्या पाचही जागा लढवीत असल्याची हवा उठवून दिली. एवढेच नव्हे तर उमेदवारांच्या नावांची देखील चर्चा होऊ लागली.

मुंबईतून निवडून गेलेल्या खासदारांमध्ये फक्त श्री. आर. डी. भंडारे सोडल्यास दुसरा एकही नव्या काँग्रेसचा खासदार नाही. केंद्रीय मंत्री के. के. शाह यांची मुंबईतून निवडणूक लढविण्याची तीव्र इच्छा आहे. त्यादृष्टीने त्यांनी फार पूर्वीपासूनच कारवाया सुरू केल्या आहेत. प्रधानमंत्री इंदिरा गांधींशी त्यांची जवळीक बघता त्यांना तिकीट मिळेलच असा अंदाज व्यक्त केला जात आहे. भंडारे आणि शाह यांच्याशिवाय महाराष्ट्राचे नगर-विकास मंत्री पु. ग. खेर, बॅ. रजनी पटेल आणि श्री. र. कृ. खाडिलकर यांचीही नावे घेतली जात आहेत. मुंबई प्रदेश काँग्रेस (नवी) चे अध्यक्ष श्री. अनंत नामजोशी यांनीही इच्छा व्यक्त केली आहे.

मुंबईतील पाच आणि एकूण सर्व महाराष्ट्रातील चाळीस-बेचाळीस लोकसभेच्या जागेची तिकिटे वाटण्याचे काम नव्या काँग्रेसच्या पार्लमेंटरी बोर्डाकडे आहे. सर्व राज्यात संभाव्य उमेदवारांच्या जोरात हालचाली सुरू आहेत. मुख्य प्रश्न चर्चिला जात आहे तो हा की महाराष्ट्रात नवी काँग्रेस कोणते उमेदवार निवडणार. कितीही नाही म्हटले तरी नव्या काँग्रेसच्या अंतर्गत जो अस्पष्ट झगडा चालू आहे तो प्रधानमंत्री इंदिरा गांधी आणि अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यामध्ये. त्यामुळे साहजिकच लोकसभेचे उमेदवार निवडताना हा झगडा जरा अधिकच स्पष्ट होईल. मुंबईतील पाच संभाव्य उमेदवारांची जी नावे दिली आहेत त्यातील बहुतेक प्रधानमंत्र्यांची माणसे आहेत. रजनी पटेल, के. के. शाह, खाडिलकर, नामजोशी ही सारी इंदिरा गांधींचीच माणसे. प्रभाकर कुंटे यांचेही नाव घेतले जाते. तेव्हा उमेदवारांची अंतिम निवड होताना भांडणे होणारच नाहीत असे सांगता येणार नाही. ज्या दक्षिण-मध्य मुंबई मतदारसंघातून कम्युनिस्ट नेते श्री. अ. डांगे निवडून आले होते तो मतदारसंघ डांगे यांच्यासाठी मोकळा सोडण्याचीही भाषा काही काँग्रेसजन बोलत आहेत. आघाड्या कशा बनतात ते येत्या आठवड्यात स्पष्ट होईल. त्यानंतरच हे उमेदवार निश्चित होतील.

महाराष्ट्रात जुन्या काँग्रेसला लोकसभेची एखादी जागा मिळाली तर ती मुंबईतच मिळेल. त्यामुळे मुंबई प्रदेश काँग्रेस (जुनी) चे जोरात प्रयत्न चालू आहेत. दक्षिण मुंबईतून मागच्या निवडणुकीत जॉर्ज फर्नांडिस यांच्या हातून मार खाल्लेले स. का. पाटील यांचा यावेळी मुंबईतूनच उभे राहण्याचा इरादा आहे. वायव्य-मुंबई मतदारसंघातून निवडून आलेले शांतीलाल शाह आणि ईशान्य-

मुंबई मतदारसंघातील तारामाई सप्रे हे दोनच जुन्या कॉंग्रेसचे लोकसभेतील मुंबईचे खासदार. पैकी सध्या चालू असलेल्या चर्चेत सप्रे बाईंचे नावही ऐकू येत नाही. मुंबईचे मेयर डॉ. शांती पटेल, श्री. एस्. आर. पाटकर आणि प्राणलाल व्होरा यांचीही नावे ऐकू येतात.

जनसंघाने आपले धोरण अद्याप जाहीर केलेले नसले तरी पक्ष-कार्यकर्त्यामध्ये चर्चा चालू आहेच. परळच्या गेल्या पोट निवडणुकीत जनसंघाने शिवसेनेच्या वामनराव महाडिकांना मदत करून निवडून दिले. त्याची किंमत घेण्याची वेळ आता आली आहे. जनसंघाने शिवसेनेशी युती केली तर मुंबईतील एक तरी जागा त्यांच्या नवकीच पदरात पडेल. अर्थात दोन्ही पक्षानी समजूतदारपणा दाखवून बोलणी केली तरच हे शक्य आहे. सोमवारी दोन्ही पक्षात झालेली बोलणी फारशी आशादायक नाहीत. जनसंघाशी युती झाली नाही तरी मुंबईतील पाचही जागा लढविण्याची शिवसेनाप्रमुख बाळ ठाकरे यांनी घोषणा केली आहे. जनसंघाच्या बाजूने श्री. मुकुंदराव आगासकर, डॉ. वसंतकुमार पंडित, गं. भा. कानिटकर यांची नावे घेतली जात आहेत.

स्वतः बाळ ठाकरे लोकसभेची निवडणूक लढविणार अशी मागे हवा होती. पण परवाच आपली तो इरादा नसल्याचे त्यांनी सांगून टाकले. आपल्याशी सहमत असणाऱ्या पक्षाशी वाटाघाटी करण्याचीही त्यांनी तयारी दर्शविली. शिवसेनेच्या वाटाघाटी दोनच पक्षाशी होऊ शकतात. जनसंघ आणि जुनी कॉंग्रेस. पैकी जुन्या कॉंग्रेसच्या सीमा प्रश्नावरील एकूण धोरणामुळे त्याच्याशी वाटाघाटी करणे अवघड जाईल असे दिसते.

मुंबईशिवाय कुलाबा जिल्ह्यातील एक जागा लढविण्याचाही शिवसेनेचा इरादा आहे. अद्याप उमेदवार निश्चित केले गेले नसले तरी येत्या आठवड्यात होतील. आपल्यालाही काही तिकिटे मिळावी म्हणून शिवसेनेच्यामागे सिनेमा क्षेत्रातील काही व्यक्ती लागल्याचे कळते. त्यासाठीच म्हणे मागे त्यांना इंडियन मोशन पिक्चर्स प्रोडयूसर्स अॅसोसिएशनने मोठे रिसेप्शन दिले होते. खरे खोटे काय ते लवकरच कळेल.

महाराष्ट्राच्या काही मंत्र्यांची लोकसभेसाठी उभे राहण्याची इच्छा असल्याचेही समजले. त्यामध्ये श्री. पु. ग. खेर आणि डॉ. रफिक झकारिया यांची नावे आहेत. आणखी एक कुणकुण कानी आली. महाराष्ट्राचे माजी महसूल मंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांनीही अशी इच्छा व्यक्त केली आहे. पण ते फारसे संभवनीय वाटत नाही. निवडणूक जवळ आली की अनेक वावड्या उठतात. त्यातच ही एक वावडी.

निवडणुकीच्या पहिल्या धडाक्याची धूळ बसल्यानंतर हळहळू चित्र स्पष्ट दिसू लागेल. कारण मुंबईत जुन्या कॉंग्रेसला स्वतंत्र, जनसंघ आणि सं. सो. पा. शी जुळ-

पृष्ठ ५५ वर

# आमचे जाहीरनामे

| | | | |
|---|---|---|---|
| **वरुण** | **राजेंद्र** | **वामन** | **फु. मि.** |
| **भिडे** | **पटवर्धन** | **शेणॉय** | **सांकला** |

## तुमच्या निवडणुका नकोत, पुढारी नकोत, वाद नकोत

**वरुण भिडे**

मी एक विद्यार्थी आहे. खरे पाहिले तर माझे शिक्षण संपलेले आहे. पण पदवीधर बेकार म्हणून रहाण्यापेक्षा पुढे शिक्षण चालू ठेवले आहे इतकाच त्याचा अर्थ. मी विद्यार्थी नाही. मी पोटार्थी आहे. मला ज्ञानसंपादन करण्याची लालसा नाही. नोकरी मिळण्यासाठी पदवीचा उपयोग होतो अशी गैरसमजूत होती. आता डोळे उघडले आहेत. नोकरी मिळण्यासाठी फक्त वशिला लागतो हे सत्य मला आज समजू लागले आहे. काही दिवसापूर्वी माझी...' ज्या विषयांचे शिक्षण घेतले त्याच विषयांचे काम करण्याची '...गुर्मी होती. आज ती शिल्लक नाही. कसलेही, काहीही, कुठेही काम करण्याची तयारी आहे. कदाचित काही दिवसात ' पदवीधर हमाल ' किंवा ' पदवीधर पॉलीशवाला ' अशी वृत्तपत्रांना चीकट पुरवू शकेन अशी खात्री आहे. मी सामान्यात जन्मलेला सामान्य आहे. माझे कोणीही महान नव्हते, मी कोणत्याही दृष्टीने असामान्य नाही. हजारो विद्यार्थ्यांतला एक आहे, अर्थातच माझे विचार हजारोंचे प्रातिनिधीक विचार आहेत.

आज विद्यार्थ्यांना फक्त भाकरी आणि स्वास्थ्य यांचीच गरज आहे. आपली समाजव्यवस्था काही हे देऊ शकेल असे वाटत नाही. या मुदतपूर्व निवडणुका आमची गरज भागवू शकेल असा संभव नाही. आम्ही जरी निवडणुकीत भाग

घेतला तरी ही परिस्थिती बदलणार नाही. फारतर विद्यार्थी शक्तीच्या मदतीने एक नवीन गुंड निवडून येऊ शकेल. सर्व विद्यार्थीवर्ग आज अत्यंत निराशावादी झाला आहे. आमचे मागणे काहीही नाही. फक्त आम्ही असंतुष्ट का आहोत हे दाखवण्याचा हा प्रपंच.

## आमचे नेते

पुढारी ही जमात आज बदनाम झालेली आहे. सत्तास्थानावर येताच स्वतःचे घर भरणारे पेंढारी हे या जमातीचे स्वरूप जगजाहीर आहे. कॉर्पोरेटर होताच स्वतःचे उखळ पांढरे करून घेणारे पुढारी सर्वांनाच माहिती आहेत. ज्या माणसाची मुले बाराशेच्या आत शिकत होती आणि रानात काटक्या गोळा करत होती तोच माणूस आमदार झाल्यावर बंगले मोटारी ठेवतो. अशा पुढाऱ्यांविषयी मी काहीही बोलत नाही. जे निःस्पृह समाज सेवक, नेते म्हणून गाजले आहेत अशांच्या विषयी मला सांगायचे आहे. विद्यार्थीसंघटना आणि त्यांचे नेते हे आमचे सर्वात जवळचे नेते. यांच्यातही पेंढारीपणाचे गुण आत्ताच दिसत आहेत. आम्हाला खेड्यात चला म्हणून सांगणारे पुढारी संधी मिळताच पुण्यातच ताबडतोब स्थिर होतात. आपले व्यवसाय, नोकऱ्या सुरू करतात. आम्हाला अत्याधुनिक विचारसरणीच्या गोळ्या देणारे पुन्हा रूढ चौकटीत अडकतात. भरपूर पगाराच्या नोकऱ्या, हजारो रुपये हुंडा घेऊन प्रेमविवाह, विद्यार्थी नेते म्हणून मोठ्या लोकांशी ओळखी आणि अर्थातच वशिलेदेखील. आम्ही सामान्य विद्यार्थी मात्र गोंधळलेले. काही पुढारी एखादा फन-फेअर चा कार्यक्रम करून त्यातली देणग्या म्हणून मिळालेली बक्षीसे आपापसात वाटून घेतात. या विद्यार्थी नेत्यांबद्दल आदर मुळीच नाही, जोड्यानी सडकायची इच्छा मात्र होते, परंतु सामान्यांपैकी एक आहे म्हणून इच्छा पूर्ण होत नाही. अशी जाहीर इच्छा व्यक्त केली तरी मलाच मार खाण्याचा प्रसंग येईल म्हणून आजपर्यंत गप्प होतो.

विद्यार्थी नेते नालायक आहेत असे नव्हे तर आपण ज्यांना निस्पृह, गंगेप्रमाणे निर्मळ मानतो त्यांचीही कटिवस्त्रे अस्वच्छ आहेत. ज्या पुढाऱ्यांना उपजीविकेचे साधन नाही, कोठेही पदावर नाहीत, फक्त सेवा इ. इ. अशा लोकांच्या देखील स्कूटर्स, बंगले, अद्ययावत् फ्लॅटस आहेत. असे पुढारी सत्तारुढ पक्षाचे नाहीत तरीही ही चैन करू शकतात आणि आम्हाला... ‘विद्यार्थ्यांनो ही समाजव्यवस्था बदलायची आहे. आम्ही फक्त तुमच्याबद्दलच आशा बाळगून आहेत’...असे सांगतात. या घोषणांच्या नादाने या भोंदू पुढाऱ्यांच्या नादी लागून काही विद्यार्थी सत्याग्रहात गेले. तुरुंगात चोरासारखा मार खाऊन परत आले. त्यांच्या शिक्षणाचे वाटोळे झाले आहे हे आज स्पष्ट दिसत असताना कोणी त्यांचे भले करतील असे वाटत नाही.

आपले तथाकथित समाजसेवक हे देखील खऱ्या अर्थानी समाजशोषक आहेत.

पृष्ठ ४१ वर

सु. ल. सोमण

# पोलंड – नवी विटी, जुनं राज्य

पूर्व युरोपातल्या ह्या कम्युनिस्ट राष्ट्रात गेल्या महिनाभरात प्रचंड उलथापालथी झाल्या. रक्ताचे पाट वाहिले. कामगारांच्या उठावाला सामान्यजनांची, विद्यार्थ्यांची साथ मिळाली. पोलिसांवर हल्ले चढवले गेले आणि मग चळवळ दडपून टाकण्यासाठी सर्व उपाय योजिले गेले. चळवळ, बंडाळी व सरकारी कारवाई ह्यांनी हजारो पोलिशांचे बळी घेतले. शेवटी ह्या उत्पातानं पोलिश कम्युनिस्ट पार्टीचे प्रमुख व्लाडिस्लाव गोमुल्का ह्यांचा बळी घेतला आणि नंतरच हा उत्पात शमला. पोलंडमध्ये आता हळूहळू नवीन राज्ययंत्रणा पाय रोवू लागली आहे. गिरेक ह्यांच्या अधिपत्याखालील नवीन शासनाला रशिया, पू. जर्मनी, हंगेरी आदी दोस्त राष्ट्रांकडून आशीर्वाद मिळाले आहेत. खुद्द पोलंडमध्येही दंगल आटोक्यात येऊन स्थिरस्थावर होताच नवीन शास्ते एडवर्ड गिरेक ह्यांनी भराभर नवनवीन सवलती जाहीर करून भडकलेल्या पोलिश जनतेला आपलंसं करून घ्यायचा प्रयत्न चालवला आहे. नाताळाच्या आदल्या दिवशी बहुतेक सर्व शहरांमधला कर्फ्यू उठवून त्यांनी धार्मिक पोल्सना दिलासा दिला. ज्या भाववाढीचं निमित्त होऊन पोलंड पेटला व त्यात गोमुल्का शासनाला आहुती मिळाली त्या भाववाढीसंबंधातही त्यांनी जनतेला निःश्वास टाकता येईल असं धोरण जाहीर केलं. भाववाढ स्वीकारण्याचं आवाहन करून त्यांनी लगेच असंही सांगून टाकलं की, ह्यापुढे ह्याच पातळीवर, कमीत कमी दोन वर्षांसाठी तरी सर्व किंमती गोठवल्या जातील. त्याचप्रमाणे कमी उत्पन्न गटाच्या लोकांना आर्थिक झळ सोसावी लागू नये.-१७५० लक्ष डॉलर्सचा निधीही गिरेक ह्यांनी घोषित केला. कामगारांना खूष करण्यासाठी ख्रिसमसपूर्वी वेतन देऊ केलं गेलं. तर काही ठिकाणी आयात करण्यात आलेले संत्र्यांचे व लिंबाचे साठेच्या साठे, सुटचा मनावण्यासाठी कामगारांना बहाल करण्यात आले.

एडवर्ड गिरेक ह्यांनी पोलिश जनतेला आपलंसं करून घ्यायचा असा प्रयत्न चालवला असला; आणि कित्येक तरुण बुद्धिवाद्यांचा व खाणमजूरांचा त्यांना पाठिंबा असला तरी, गिरेक ह्यांना बिकट परिस्थीतूनच वाटचाल करावी लागणार आहे. ज्या विशिष्ट परिस्थितीतून गिरेक ह्या महत्पदाकडे पोचले आहेत, अगदी

त्याच परिस्थितीतून १४ वर्षांपूर्वी गोमुल्का ह्यांनी सत्तासूत्र हातात घेतली होती. कम्युनिस्ट राजवटीतच, स्टालिनविरोधाखातर त्यांनी पाच वर्षे तुरुंगवास भोगला व नंतर पोझनान शहरातून उफाळलेल्या दंग्यानंतर, 'भाकरी व स्वातंत्र्य' मोर्च्याचं नेतृत्व करून ते वॉर्सात सत्ताधीश बनले. 'पोलिश कम्युनिझम्'चा पुरस्कार करून त्यांनी रशियाच्या वर्चस्वाला विरोध केला; जनतेला व्यक्तिगत स्वातंत्र्य दिलं, धर्मात ढवळाढवळ केली नाही; मा. टिटोंना रशियन विरोधाला न जुमानता उचलून धरलं...परंतु गोमुल्कांना हे धोरण फार दिवस राबवता आलं नाही. रशियन दडपणाखाली काही स्टालिनवाद्यांना, त्यांना पोलिश कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यकारी मंडळावर स्थान द्यावं लागलं. बौद्धिक, वैचारिक स्वातंत्र्याला मुरड घालावी लागली. विद्यार्थ्यांच्या चळवळी दडपून टाकाव्या लागल्या. रशियन दडपणामुळे अरब-इस्त्रायल भांडणात बहुसंख्य पोलिश जनतेच्या मनाविरुद्ध त्यांना अरबांची बाजू घ्यावी लागली. झेकोस्लावाकियावरील रशियन आक्रमणात त्यांना भाग घ्यावा लागला. ह्या साऱ्यातनं गोमुल्कांविरुद्धचा असंतोष संघटित होत गेला. कुणी म्हणतात, १९६८ च्या विद्यार्थ्यांच्या उठावांच्या वेळीच गोमुल्कांचं पतन निश्चित झालं होतं. त्यांच्याविरुद्ध चाललेलं जनमत एकदम बिथरलं ते, गोमुल्का शासनानं घोषित केलेल्या भाववाढीमुळे! विशेष म्हणजे, ह्याचवेळी प. जर्मनीबरोबरच राजकीय पट पोलंडच्या बाजूनं जिंकला जात असता, पोलिश अर्थव्यवस्था मात्र साफ कोसळली होती. त्यातनच बंडाळी उठली. जर्मनांबरोबरचं सहकार्य पोलिशां-बरोबरच ज्या 'ज्यूं'ना हिटलरनं झोडपलं त्या 'ज्यूं'ना रशियन दडपणाखाली केलेला विरोध, आर्थिक अवमूल्यन, स्वातंत्र्याची गळचेपी...ह्या साऱ्यामुळे पेट-लेल्या पोल्सनी त्यांच्या एकेकाळच्या अत्यंत लाडक्या नेत्याचा राजकीय बळी घेतला! कुणी म्हणतात, नाताळपूर्वी घोषित केली गेलेली भाववाढ केवळ गोमुल्कांचा बळी घेण्यासाठीच होती!

जे प्रश्न गोमुल्का-राजवटीत शेवटी भडकले, तेच प्रश्न गिरेक राजवटीला सता-वणार आहेत. तूर्त तरी गिरेकना विरोधकांना चुचकारल्यावाचून गत्यंतर नाही. काही सवलतीही त्यांना जाहीर कराव्या लागणार आहेत. तर त्याचवेळी मोकझार ह्या कट्टर राष्ट्रवाद्याशी त्यांना सामना द्यावा लागणार आहे. पोलंडमधल्या ताज्या उलथापालथीत त्यांना मोझकार ह्यांच्याशी जुळवून घेऊनच पुढे पाऊल टाकावं लागलं आहे. मोझकार ह्यांना तर कार्यकारिणीवर घ्यावं लागलंच आहे; परंतु त्याचबरोबर त्यांच्या तीन सहकाऱ्यांनाही पॉलिट-ब्यूरोवर घ्यावं लागलं आहे. मोझकार कट्टर राष्ट्रवादी आहे. त्यांना तिथल्या तरुणांचा व मिशनचा भरपूर पाठिंबा आहे. अर्थातच अशी कट्टर राष्ट्रवादी व्यक्ती राशियाला मानवणं कठीणच. म्हणनच, तूर्त जरी गिरेक बंडखोरांना हाताशी धरून असले तरी मोझकारपेक्षा ते नक्कीच रशियन वर्चस्व मानतील हे गृहित धरूनच, रशियानी गिरेक ह्यांची

भलावण चालवली आहे!

साहजिकच, विटी नवी असली, तरी काही दिवसांच्या वैचारिक स्वातंत्र्याच्या आभासापलीकडे रशिया पोल्सना काही मिळू देईलसं वाटत नाही! अशावेळी मोझकार वगैरेंच्या वाट्याला कसलं जीणं येतं त्याची हंगेरी, झेकोस्लावाकिया ही उदाहरणं ताजीच आहेत!

कम्युनिझम् युगोस्लावियासारखा 'राष्ट्रीय' होत नाही, तो रशियन किंवा चिनी राहातो, हेच तर त्या चळवळीचं दुर्दैव!

## हिंदी महासागर : बड्यांचं सागरी स्पर्धास्थान

हिंदी महासागरात सध्या काय चालू आहे? रशिया आणि अमेरिका ह्यांच्यातल्या स्पर्धेनं महासागर व्यापला जाऊन, तिथली संबंधित राष्ट्रं सतत तणावाखाली तर येत नाहीत ना? सिंगापूर व मलेशिया इथे राहणाऱ्या ब्रिटिश फौजांना महासागरी वाहतूक रशियन दडपणाखाली सुरक्षित राहिल का? भारतीय, ब्रिटिश ऑस्ट्रेलियन, ब्रह्मी, सिलोनी, आफ्रिकी...साऱ्यांना आज ह्या प्रश्नांनी बेचैन करून सोडलं आहे. ठिकठिकाणच्या लोकसभातनं, वृत्तपत्रातनं ह्या प्रश्नांची आज चर्चा चालू आहे.

सुवेझच्या पूर्वेकडील सर्व सैनिकी हालचाली बंद करण्याचा इंग्लंडनं निर्णय घेतल्यापासून, हिंदी महासागरात एक विशिष्ट पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी भरून काढता येईल एवढं सामर्थ्य हिंदी महासागरातल्या कुठल्याही देशाजवळ नाही. चीननं प्रयत्न केला तरीही चीनचं सामर्थ्य तोकडंच पडेल. साहजिकच ह्या परिस्थितीचा फायदा रशियानं घेतला. हिंदी महासागरात वर्चस्व प्रस्थापित करण्याकडे रशियानं पद्धतशीर पावलं टाकली. आणि त्यातनंच भारतासुद्धा अनेक राष्ट्रांपुढे प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. किमान १० व सर्वसाधारणपणे ३० तरी रशियन नौका सध्या हिंदी महासागरात संचार करीत असतात. विशाखापट्टम् इथला बंदरविकास रशियन सहकार्यानं झाला असून, विशाखापट्टम्चा 'रशियन युद्धनौका-तळ' म्हणून उपयोग करायला परवानगी मिळावी असा रशियाचा प्रयत्न चालू आहे. तर लाल समुद्राच्या टोकावरील सोकोत्रा ह्या येमेनी बेटांवर सागरी प्रक्षेपण केंद्र व स्फोटक पदार्थांचे साठे ते तयार करीत आहेत. मॉरिशसमध्ये रशियनांनी सागरी सवलती मिळवल्या आहेत. इजिप्त ते इंडोनेशियाच्या संपूर्ण पट्ट्यात दहा विविध राष्ट्रांशी त्यांनी मत्स्योत्पादनसंबंधात विविध करार केले आहेत; तर रशियन जहाजांना टेकू मिळू शकतील अशी अनेक केंद्रं पूर्व आफ्रिकन किनाऱ्यावर उभारली आहेत. थोडक्यात, ब्रिटिशांनी सोडलं ते रशिया जमवू पाहत

आहे. पूर्वी इंग्लिश खाडीपासून चीनपर्यंत ब्रिटिश युद्धनौकांची रांग लागलेली असायची. आज ही रांग ब्रिटननं उधळून लावली आहे. परंतु तेच दुवे उचलून रशियन नौका ती रांग पुन्हा सांधू पाहत आहेत !

रशियानं टाकलेलं हे योजनाबद्ध पाऊल आहे असंच अनेक लष्करी तज्ञांना वाटतं. त्यांच्यामते, प्रबळ नाविक महत्त्वाकांक्षेच्या उद्दिष्टानं सुरू झालेली ही वाटचाल आहे. ऑस्ट्रेलियन इन्स्टिटयूट ऑफ इंटरनॅशनल अफेअर्स ह्या संस्थेचे प्रमुख मिलर लिहितात, 'कुठेही हस्तक्षेप करण्याइतपत प्रचंड सामर्थ्य आज रशियाजवळ निश्चित आहे. त्याच्याच जोरावर त्यांचं हे धाडस ! हिंदी महासागरातल्या त्यांच्या हालचालींची उद्दिष्टं पुढीलप्रमाणे सांगता येतील–

१. सुवेझ कालव्यावर वर्चस्व संपादणे.

२. तेल निर्मिती करणाऱ्या प्रदेशांवर प्रभुत्व मिळविणे.

३. वेळ पडल्यास सैनिकी सहाय्यानं का होईना, पण महत्त्वाच्या टापूंवर राजकीय दडपण आणता येणे शक्य होणे. आणि

४. रशियाचा व्यापार वृद्धिगत करणे.

अर्थात एकदा का रशियन वर्चस्व प्रस्थापित झालं की अमेरिकेला सुवेझच्या पूर्वेकडे प्रवेश मिळणंही दुरापास्त होणार हे ओघानंच आलं. साहजिकच अमेरिकन हालचाल अपेक्षित होतीच. दिगो ग्रॅशिआ ह्या महासागरातल्या छोटयाशा ब्रिटिश बेटावर हवाई आणि रेडिओ दळणवळण केंद्र प्रस्थापित करून अमेरिकेने आपली महासागरी आघाडी उघडली आहे. ब्रिटिश व अमेरिकन विमानांना व जहाजांना ह्या केंद्राचा 'तळ' म्हणून उपयोग करता येईल. युद्धनौका, विनाशिका आदी धरून इथे दहा जहाजं राहतील. ह्याखेरीज पर्शियन गल्फमधील ब्रिटिश जहाजं, बहारीन येथील दोन अमेरिकन विनाशिका, सिंगापूरमधली २० ब्रिटिश जहाजं आहेतच. थोडक्यात, हिंदी महासागर, दोन सत्ता नाविक श्रेष्ठत्वासाठी झगडताना पाहणार आहे...

अमेरिकन शासकीय प्रतिक्रिया, 'घराची दारं रशियनांसाठी सताड उघडी टाकणं अर्थातच शक्य नव्हतं !'

□ □ □

# परचुरे प्रकाशन पंचविशी

अत्रे-सावरकरांचे प्रकाशक म्हणून मराठी वाचकांपुढे ठळकपणे आलेल्या ग. पां. परचुऱ्यांच्या प्रकाशन व्यवसायाने आता पंचविशीत प्रवेश केला आहे. त्यानिमित्ताने मुंबईत त्यांनी एक अलिशान समारंभ साजरा केला. कुटील राजनीतीतले लढवय्ये चार्वाक अशी पांढपेशा लेखकांच्या मनावर स. का. पाटलांची प्रतिमा उमटलेली आहे. त्यांना साहित्यिकांसमोर अध्यक्षीय भाषण करायला लावून ते हास्याचा फेसफुलोरा उधळण्यात लेखकांपेक्षाही उजवे आहेत, ह्याची खात्री त्यांनी पटवून दिली. आचार्य अत्रे यांनी चर्चिल, लिंकन, गडकरी, कोल्हटकर वगैरे विनोदमार्तंडांच्या निर्मळ विनोददृष्टीवर गौरवून लिहिलेल्या लेखांचा संग्रह "विनोदगाथा" ह्या नावाने ह्या समारंभात प्रसिद्ध करण्यात आला. परचुरे प्रकाशन मंदिराचे हे चारशेवे प्रकाशन. ह्या समारंभाला जोडूनच "वृत्तपत्र व्यवसाय साहित्याला शाप आहे." ह्या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. लेखकाला चिंतन करावयाला भरपूर रिकामा वेळ मिळाला पाहिजे, चिंतनातून स्फुरलेल्या विचारांचं प्रत्यक्ष लेखन करण्याला पैशापोटी लाभणारं स्वास्थ्य मिळालं पाहिजे आणि वृत्तपत्रांच्या धागडधिंग्यात ह्या दोन्ही गोष्टींचा अभाव असल्यामुळे वृत्तपत्रव्यवसायिकांकडून सकस साहित्यसेवा होऊ शकत नाही, हे नेहेमीचेच मुद्दे सर्वांकडून उगळून झाले. तसंच, काका खाडिलकर, केळकर, कोल्हटकर प्रभृतींचा काळ आणि खाक्या वेगळा होता, आता सर्रास सगळेच पोटार्थी झाल्यामुळे साहित्यसेवेतली ध्येयवादाची झिंग औषधापुरतीही उरलेली नाही आणि आजकालचे लेखक वृत्तपत्रीय जाहिरातबाजीचे ओशाळे तरी असतात किंवा त्याची टूक धरून तरी मेजाजवळ बसलेले असतात, हेही जुनेच सवंग मुद्दे लेखकांच्या तोंडावर फेकण्यात आले. वास्तविक पहाता अशा परिसंवादाच्या वेळी सर्वसाधारण बोरूबहाद्दरांबद्दल टाळ्याखेऊ पण वायफळ बोलण्यापेक्षा, कवी कुसुमाग्रज, प्रभाकर पाध्ये, चिं. य. मराठे, शंकर सारडा, डॉम मोरायस, खुशवंतसिंग, कमलेश्वर, अशा वृत्तपत्रीय धागडधिंग्यात राहूनही साहित्यात लक्षणीय भर घालणाऱ्या लेखकांची उदाहरणं देऊन विचार व्हायला हवा होता. तसंच, पु. शि. रेगे, श्री. ना. पेंडसे, दुर्गा भागवत, पु. भा

भावे, गंगाधर गाडगीळ, जी. ए. कुलकर्णी, सदानंद रेगे, विजया राजाध्यक्ष वगैरे पृथगात्म लेखकांची लिहिती पिढी वृत्तपत्रीय प्रसिद्धीची कितपत पर्वा किंवा आशा करते, तेही सांगायला हवं होतं. पण परिसंवादाचं एकूण स्वरूपच क्रिकेटच्या महोत्सवी सामन्यासारखं मनोरंजनात्मक आणि सोईस्कर असल्यामुळे कुणी आपल्या आणि श्रोत्यांच्या डोक्याला फारसा शीण होऊ दिला नाही. त्यातल्या त्यात, आचार्य अत्र्यांची अलीकडच्या दहा पंधरा वर्षांत लिहिलेली नाटकं काळाच्या ओघात अजिबात टिकणार नाहीत, कोमेजतील, असं परखड विधान दि. वि. गोखल्यांनी अत्र्यांच्या प्रकाशकाच्याच सभेत ठोसपणे करून आपण साहित्याच्या विचारात कुणाची भाडभीड बाळगीत नाही हे स्पष्टपणे दाखवून दिलं. त्यावेळी सभा क्षणभर चपापली.

आघाडीवरचे यशस्वी प्रकाशक म्हणून ग. पां. ची जरी ख्याती असली तरी त्यांच्यापाशी हुन्नरही आहे. परचुरे, पुराणिक आणि मंडळी, बळवंत पुस्तक भांडार ढवळे प्रकाशन, वगैरे संस्थामधून ग्रंथ विक्रीचा श्रीगणेशा गिरवीत असतानाच ते आकाशवाणीकडे आकृष्ट झाले. शुद्ध ब्राह्मणी ढंगाचे उच्चार असलेला तरुण नट पेशव्यांची, किंवा गेला बाजार वामनभटजींची वगैरे कामे करायला आकाशवाणीला हाही हवाच होता. तशात ग. पां. चा पुस्तकांच्या दुकानाशी संबंध असल्यामुळे आकाशवाणीवाल्यांना त्यांच्या अडीनडीला जुन्या नाटकांच्या चोपड्या उपलब्ध करून देऊन वेळ साजरी करून न्यायलाही त्यांचा उपयोग होई. त्यामुळे ब्राह्मणी शब्दोच्चार, खटपटी वृत्ती आणि दुसऱ्याचे मन न दुखवण्याचे धोरण, ह्या तीन विद्यांच्या बळावर मुंबई आकाशवाणीचे तेव्हाचे कारभारी मोहन नगरकर ह्यांच्या समंजस प्रेमाला ते पात्र झाले. आकाशवाणीच्या श्रुतिकांचा एक जमाना ग. पां. नी खुळखुळवलेला आहे. त्या अनुभवातून ते बालनाट्याचे यशस्वी लेखक झाले. ' सिंहगड ',' मैत्रिणी ',' शिवाजीचा सिंहगड ', ' जातिवंत जवान ' ही त्यांची नाट्यसंपदा यशवंत ठरली. शिवाय, ' मुलांचे तात्याराव सावरकर ' ' मेवामिठाई ' ही बालवाङ्मयाची पुस्तकंही त्यांनी लिहिली. सावरकर, अत्रे, फडके, पु. ल. देशपांडे अशा लाभदायक लेखकांची पुस्तके प्रसिद्ध करीत असतानाच, ते दुसऱ्या बाजूने वि. वा. हडप, गणेशपंत बोडस वगैरे नव्या जमान्यात गांगरलेल्या आणि चलती नसलेल्या वयोवृद्ध लेखकांना आधार देत होते, हे अधिक महत्त्वाचं आहे. विशेषतः नाटककार गणेशपंत बोडसांना हस्ते परहस्ते चार पैसे मिळावेत आणि त्यांचे कुशल असावे म्हणूनं त्यांनी सरकारदरबारी बहुत हेलपाटे मारले. बोडसांची कॅन्सरची शस्त्रक्रिया यशस्वी होण्यात दैवी अनुग्रहाचा भाग जितका आहे तितकाच ग. पां. नी दाखवलेल्या औदार्याचाही आहे.

अत्रे थिएटर्सचं कारभारीपणही ग. पां. नी मोठ्या उमेदीनं आणि हिकमतीने केलं. परचुऱ्यांच्या एकूण यशात ह्या कारभारीपणाचाच सिंहाचा वाटा असणार !

अत्र्यांना आवडणारा छत्र्यांचा काजूबियांचा खरपूस कोल्हापुरी चिवडा असो, रॉयल्टीचा अलिखित हिशोब असो, किंवा नाट्यप्रयोगांची ठोक आणि भरघोस रक्कम मोजणे असो, साहेबांना त्यांनी कधी नाही म्हटलेलं नाही. मुळात नाटक कंपनी, नि त्यातून ती अत्र्यांची ! तिचं व्यावहारिक सारथ्य करणं सामान्य भोजनभाऊचं कामच नव्हे. हुन्नराबरोबरच ग. पां. च्यापाशी जन्मजात अक्कलहुशारी असल्या-मुळेच ते तिथेही व्हायचे तसे यशस्वी झाले. त्यांनी मालकांसकट बहुतांची अंतरे राखिली. काहींना आदरणीय अंतरावर ठेवलं. अत्र्यांच्या कंपनीचे प्रयोग धो-धो होत होते तेव्हाची गोष्ट. ग. पां. खुर्दाची गुठली बांधून घेऊन गेल्यानंतर त्यांचा तिकीट विक्रेता मला म्हणाला, "हो भट बरोच वस्ताद असा. कुणांग् पास दिवचो ना की फुकटे बसवचो ना. पडदो वैर गेल्लो को नाच जाता !" किंबहुना, ह्याच त्यांच्या विद्येमुळे, जेव्हा इतर फडर्या धुरंधरांनी नाट्यक्षेत्रातुन सूंबाल्या ठोकला, तेव्हा ग. पां. तिथे मांडी मारून बसले. 'तो मी नव्हेच !' हे नाटक रांगणेकरांकडे यायला ग. पां. हे एकमेव कारण आहेत. 'झटाटेवडे खाणारा बुवा' हेच नाटक लिहा-यचा अत्र्यांचा मानस प्रथम कसा होता, ज्ञानेश्वर नाडकर्ण्यांच्या हातातलं अमेरिकन नाटक प्रभाकर पणशीकरांनी अत्र्यांना वाचायला कसं लावलं, कांशी केसवरचंच नाटक गल्ला मिळवू शकेल असा झक्कू रांगणेकरांनी अत्र्यांच्या मागे कसा लावला, ग. पां. नी निरोपानिरोपी कशी सद्भावनेने केली, मग अत्र्यांनी आज एक पान, उद्या दुसरं पान असं करीत करीत 'तो मी नव्हेच !' कसं लिहिलं, पुढे ते रंग-भूमीवर कसं आलं, हा इतिहास आमच्यासारख्या ज्यांना माहीत आहे, त्यांना ग. पां. च्या शब्दाची 'साहेबा 'कडे काय पत होती ते पटलं आहे. परचुऱ्यांचा शब्द साहेबांनी मानला आणि नाट्यलेखनाच्या क्षेत्रातून एका तपाच्या वनवासाला गेलेलं आपलं कलम पुन्हा लिहितं केलं. म्हणजे पहा, एका धोंड्यात परचुऱ्यांनी पाच पक्षी हाणले. 'नाट्य-निकेतन 'ला भरभराटीचे दिवस प्राप्त करून दिले; अत्र्यांचा नाट्यलेखनातला आत्मविश्वासाचा झरा वाहाता केला; आपल्या प्रकाशन संस्थेच्या खात्यात एका खपाऊ नाटकाच्या नावे पान उघडलं; नाटक मंडळीच्या अलिखित कारभारीपणाला समर्थपणे हात घातला; आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे नाटकाच्या भरमसाट प्रसिद्धीचं एक नवं वारंच जिकडेतिकडे फैलावून दिलं ! राजकारणाचे मथळे ओलांडून नाटकाच्या खमंग जाहिराती वाचण्याचं युग तेव्हापासूनच आहे. अत्र्यांच्या आजूबाजूला काय कमी माणसं घिरंगली ? पण ग. पां. नी दाखवलेला डोकेबाजपणा कुणालाच जमला नाही आणि अत्र्यांच्या इतक्या निकट सहवासात रात्रंदिवस राहूनही, त्या अचाट माणसाच्या मृत्यूनंतर जो धुराळा उडाला, त्यातला एक कणही त्यांनी आपल्या परीटघडीच्या वस्त्रांवर बसू दिला नाही. जो इतका सावध आहे तो पंचवीसच काय, शंभर वर्षंसुद्धा प्रकाशनाच्या धंद्यात काढू शकेल. घोडामैदान जवळच आहे !

□ □ □

१३ जानेवारी १९७१

# मराठवाड्याची हालहवाल

देवदत्त तुंगार

## गोदातीर समाचाराचा वर्धापनदिन व पू. दत्ता बाळ–

नांदेडच्या दैनिक गोदातीर समाचारने ९ वर्षे पूर्ण करून १ जानेवारी १९७१ रोजी दहाव्या वर्षात पदार्पण केले. वर्धापनदिनासाठी कोल्हापूरहून पूज्य श्री. दत्ता बाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. वर्धापनदिनासाठी राजकीय पुढाऱ्या–ऐवजी कोणीतरी 'चांगला' माणूस बोलवावा असे मला व श्री. प्रभाकर रावके आदी मित्रांना वाटत होते. आमचा हा विचार मान्य होऊन श्री. व सौ. रसाळ यांनी पूज्य श्री. दत्ता बाळ यांना नांदेडला बोलावले. प्रथमतःच ते या भागात येत असल्याने त्यांचे इतरत्र कार्यक्रमही ठेवण्यात आले. कलामंदिर साहित्य, तसेच मुखेड, देगलूर व धर्माबाद आदी ठिकाणी पू. दत्ता बाळ यांच्या व्याख्यानांचे कार्य–क्रम आयोजिण्यात आले. या सर्व व्याख्यानांचा संक्षिप्त गोषवारा देणेही स्थला–भावी शक्य नाही. पण नांदेड जिल्ह्यात पू. दत्ता बाळ यांच्या 'वाग्यज्ञाने' चैतन्याचे वारे संचारले आहे हे स्पष्टतः दिसते. श्री. दत्ता बाळ यांच्या विचारांची झेप किती मोठी आहे, विविध विषयांचा त्यांचा व्यासंग कसा जबरदस्त आहे व वाणीमध्ये कसे ओज आहे याचा प्रत्यय नांदेडकरांना आला.

गोदातीर समाचार दैनिकाच्या वर्धापनदिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून बोल–ताना श्री. दत्ता बाळ म्हणाले की समूहमनाचा प्रगट झंकार म्हणजे वृत्तपत्र होय. संपादकास समाजाच्या अतिउच्च अभीप्सेपासून निम्नतम विकार विकृतिपर्यंत समग्र दर्शन घ्यावे लागते. वृत्तपत्र हा जनमनाचा केवळ आरसा असून उपयोगी नाही तर समाजाच्या उत्क्रांतीची दिशा दाखविणारे ते 'होकायंत्र 'ही बनले पाहिजे.

नांदेडच्या पीपल्स व सायन्स कॉलेजच्या स्नेहसंमेलन प्रसंगी भाषण करताना श्री. दत्ता बाळ यांनी असे सांगितले की तरुण म्हणजे ज्याला आत्म्याचा स्पर्श झाला आहे तो व म्हातारा म्हणजे जो स्थितीशील आहे तो. व्यक्तिमत्त्वाची शास्त्रशुद्ध बांधणी करून संवेदनक्षमतेची क्षेत्रे विस्तारण्यासाठी नव्या पिढीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. विवेकानंद, सँडो आणि आइन्स्टाईन या त्रिमूर्तीचा आदर्श तरुणांनी आपल्यापुढे ठेवावा.

मुखेड येथे जाहीर भाषणात बोलताना ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद गाडून टाकून ही जळमटे, कोळीष्टके नष्ट करा असे श्री. दत्ता बाळ यांनी आवाहन केले आणि नैतिक पुनर्जागरणासाठी महापुरुषांच्या जीवनाचा अधिक श्रद्धेने अभ्यास करण्याची

आज गरज असताना विभूतिभंजन करण्यातच अनेक लोक 'पुरुषार्थ' व 'पुरोगामी-पणा' समजत आहेत, याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. देगलूर येथे भाषण कर-ताना श्री. धोंडगे यांनी प्रभू रामचंद्राबद्दल जी निराधार टीका चालविली आहे तिचा श्री. दत्ता बाळ यांनी खरपूस समाचार घेतला. देगलूर येथे त्यांनी इंग्रजीत जे भाषण केले व त्यानंतर जी मार्मिक प्रश्नोत्तरे झाली तो एक अभूतपूर्व असा आगळा जीवनानुभव होता.

## मालेगावच्या खंडोबाची यात्रा

नांदेड जिल्ह्यातील मालेगावची यात्रा दरवर्षी फार मोठ्या प्रमाणावर भरते. पण यंदा यात्रेकरू कमी संख्येत आले. या औदासीन्याचे कारण भयानक दुष्काळी परिस्थिती हे आहे. लोक-शिक्षणाच्या उद्देशाने आयोजित विविध प्रदर्शनामध्ये लोकांना 'रस' नव्हता. लोकनाट्याचे (म्हणजे सोप्या भाषेत तमाशाचे) भव्य तंबू मात्र यात्रेकरूंना आकर्षित करण्यात बरेचसे यशस्वी झाले. पण त्यांनाही यंदा फारशी कमाई झाली नाही. रिपब्लिकन व काँग्रेसच्या लोकांनी तसेच मातंग समा-जाच्या लोकांनी पुढाकार घेऊन ज्या जाहीर राजकीय सभा घेतल्या त्यांना इतरा-पेक्षा अधिक उपस्थिती होती.

दरवर्षी यात्रेकरूंना पिण्याच्या पाण्याची अत्यंत गैरसोय होत होती. त्यासाठी आमदार केशवराव धोंडगे यांनी 'तीर्थ-पाजू' सत्याग्रहाचा आदेशही दिला होता. यंदा पाण्याची सोय नळ योजनेमुळे झाली व वीजेच्या रोषणाईने यात्रा उजळून निघाली. यात्रेकरूंची संख्या मात्र बरीच रोडावली होती.

## निवडणूक रिंगणातील डावपेच

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लोकसभा विसर्जित करून सार्वत्रिक निवडणूक घेण्याचे जाहीर करताच सर्वत्र खळबळ माजली. जनसंघाचे श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी 'Lady protests too much' म्हणून इंदिरा गांधींच्या मध्या-वधी निवडणुकीच्या निर्णयाचा, निर्णय घेण्यापूर्वी, जो अंदाज व्यक्त केला होता तो खरा ठरला. मराठवाड्यात लोकसभेच्या सहा जागा आहेत. मराठवाड्यात काँग्रे-सचा 'होल्ड' फार मोठा आहे. पण देशातील बदलत्या राजकीय वाऱ्यामुळे येथेही काय होईल हे निश्चित सांगता येणार नाही. माझे मित्र व प्रसिद्ध रिपब्लिकन कार्यकर्ते श्री. भाऊसाहेब मोरे नुकतेच औरंगाबादहून नांदेडला आले होते. दलित समाजात श्री. मोरे यांनी दीर्घकाळ काम केले असून डॉ. आंबेडकर यांच्या पहिल्या कार्यकारिणीमध्ये त्यांचाही समावेश होता. त्यांनी व 'पंचनामा' या नांदेडच्या साप्ताहिकाचे संपादक श्री. लक्ष्मणराव गायकवाड यांनी रिपब्लिकन एकीकरण

समिती काही दिवसापूर्वीच स्थापन केली. दलित जनतेच्या नेत्यातील फूट 'बंद' करण्याच्या उद्देशाने ही एकीकरण समिती स्थापन झाली असून लोकसभेच्या सहा-पैकी पाच जागा ( मराठवाड्यातून ) ती लढविणार आहे. चांगले व तळमळीचे कार्यकर्ते निवडणुकीत अपयशी होतात आणि 'पुढारी' टाईप उमेदवार निवडून येतात. श्री. भाऊसाहेब मोरे यांच्यासारखे उमेदवार निवडून येतील तेव्हा लोकशाहीचा खरा 'कस' लागला असे म्हणता येईल.

## श्री. पु. भा. भावे यांची भाषणे

मराठीमधील ख्यातनाम कथाकार भाषाप्रभू श्री. पु. भा. भावे यांची तीन भाषणे प्रतिभा नाटय मंदिराच्या साहित्य सभेने प्रा. कुरुंदकर यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड येथे नुकतीच आयोजित केली. स्त्रीविषयक माझा दृष्टिकोन, साहित्यातील श्रेष्ठ व कनिष्ठ आणि युद्धाच्या सावल्या या तीन विषयांवर त्यांची व्याख्याने झाली. आगरकर, रानडे, गोखले इत्यादी समाजसुधारकांनी 'स्त्री–सुधारणा' संबंधी जो दृष्टिकोन मांडला आहे त्यावर कडाडून हल्ला श्री. भावे यांनी चढविला. स्त्री-पुरुष समान नाहीत व समान नसावेतच असे मुख्य सूत्र ठेवून स्त्री–पुरुषांनी आपले भिन्न भिन्न नैसर्गिक गुण वाढवावेत व एक-दुसऱ्याच्या जीवनास परिपूर्णता आणावी असे विविध उदाहरणांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला. एका वेगळ्या 'टाईप' चे भाषण अनेक दिवसांनी नांदेडकरांना ऐकायला मिळाले. कलाकृतीमधील श्रेष्ठ आशयघनता पेलून धरण्यासाठी कलावंताचे व्यक्तिमत्वही तितकेच समर्थ हवे हा विचार श्री. भावे यांनी आग्रहाने प्रतिपादन केला.

## दुष्काळ जाहीर करा

नांदेड जिल्ह्यावर दुष्काळी छाया पसरली असली तरी अद्याप दुष्काळी कामे काही सुरू झाली नाहीत. भोकर तालुक्यात ही कामे त्वरित सुरू करावीत अशी मागणी जाहीर सभेत श्री. गायकवाड आणि श्री. जंगम स्वामी यांनी केली. परभणी जिल्ह्यात अशी कामे त्वरित हाती घेण्यात येत आहेत, ही समाधानाची बाब आहे. औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद जिल्ह्यात पीकपाणी असमाधानकारकच आहे. सर्व मराठवाडाच 'दुष्काळी' जाहीर करून त्वरित मदत कार्य सुरू केले पाहिजे. यंदा ग्रामीण भागात 'दुर्भिक्ष्यामुळे' चोऱ्या दरोडेखोरी आणि 'नक्षलवाद' वाढण्याची भीती असून पोलिसदलाने अधिक सावध राहिले पाहिजे. कापूस आणि मुख्यतः ज्वारीचे पीक हातचे गेले. सर्वच 'हवाल–दिल' आहेत.

□ □ □

# निवडणुका : प्राथमिक चित्र

वा. दा. रानडे

लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुका घोषित झाल्या आणि राजकीय पक्षांनी लागलीच कंबरा कसल्या. लोकसभेत आपल्या पक्षास निर्विवाद बहुमत मिळवून आपले बहुमत टिकविणे हे इंदिरा गांधींचे मुख्य उद्दिष्ट तर 'इंदिरा हटाव' हे इंदिरा विरोधकांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

इंदिरा काँग्रेस, कम्युनिस्ट व मुस्लीम लीग यांच्या 'अपवित्र व देशद्रोही युती'च्या हाती देशाची सूत्रे जाऊ द्यावयाची नाहीत यावर इंदिराविरोधी आघाडीची प्रचाराची सारी मदार आहे. कम्युनिस्ट व लीगची संगत आपणास बाधणार याची इंदिरा गांधींनाही जाणीव झाली असून निवडणुकीत या पक्षांशी समझोता न करण्याचे अलिखित व अघोषित धोरण त्यांनी स्वीकारले आहे असे दिसते. राष्ट्रीय पातळीवर तर त्यांनी कोणत्याच पक्षाशी समझोता केलेला नाही. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने कम्युनिस्टांशी कोणताही समझोता करावयाचा नाही असे ठरविले आहे. पण प्रजासमाजवादी, रिपब्लिकन पक्ष व शे. का. पक्ष यांच्याशी काही जागांबाबत समझोता होईल असे दिसते. कम्यूनिस्ट व लीगशी समझोता न केल्याचा परिणाम म्हणून केरळमधील बहुतेक व पश्चिम बंगालमधील काही जागा इंदिरा-काँग्रेस गमावील. पण तेथे गमावलेल्या जागांपेक्षा अधिक जागा या धोरणाने इतर राज्यात आपण मिळवू असा त्यांचा कयास आहे.

पश्चिम बंगालमध्ये इंदिरा-काँग्रेस व बंगला-काँग्रेस यांची युती होत आहे. दोन्ही कम्युनिस्ट आघाड्यांची मते आपसात विभागली जातील व त्याचा फायदा इंदिरा-काँग्रेस व बंगला-काँग्रेस यांच्या आघाडीस मिळेल. ओरिसामध्ये जनकाँग्रेसच्या पाठिंब्याने इंदिरा-काँग्रेस पूर्वीपेक्षा अधिक जागा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे.

## नुसतीच आघाडी

इंदिरा गांधीविरोधी पक्षांनी आघाडी स्थापन केली खरी पण ती स्थापतान त्यांच्यातील मतभेद उघडे पडले. किमान कार्यक्रमाच्या पायावर आघाडी स्थापण्याचा निर्णय निजलिंगप्पा-कॉंग्रेस, जनसंघ व स्वतंत्र पक्षाच्या नेत्यांनी प्रथम जाहीर केला. त्यासंबंधी संयुक्त निवेदन जाहीर होणार होते. पण ते जाहीर होण्याच्या आतच नेत्यांनी पवित्रा बदलला. निजलिंगप्पा-कॉंग्रेस, जनसंघ व संयुक्त समाजवादी पक्ष या पक्षांच्या नेत्यांनी आघाडी स्थापल्याचे जाहीर केले, पण स्वतंत्र पक्ष त्यात सहभागी झाला नाही. कारण आधी ठरल्याप्रमाणे ही आघाडी किमान संयुक्त कार्यक्रमावर आधारलेली नव्हती. नाव आघाडी असले तरी तो केवळ निवडणूक समझोता होता. संयुक्त समाजवादी नेत्यांना किमान कार्यक्रमावरची आघाडी निवडणुकीपूर्वी नको होती. त्यांच्या दबावामुळे निजलिंगप्पांनी पवित्रा बदलला असा आरोप मसानींनी केला. ‘समाजवादी लोकशाही आघाडी’ आम्ही स्थापणार असे निजलिंगप्पा सहा महिन्यापूर्वी म्हणत होते. त्यांच्या पक्षाच्या लखनौ येथील अखिल भारतीय समितीच्या बैठकीत ‘समाजवादी’ शब्द गाळण्यात आला आणि रविवारी दिल्लीत निजलिंगप्पा कॉंग्रेस, जनसंघ व संयुक्त समाजवादी नेत्यांनी केलेल्या आघाडीच्या घोषणेत ‘लोकशाही’ शब्दही गळला. समाजवाद गेला, लोकशाही गेली, राहिली नुसतीच ‘आघाडी.’ तत्त्वशून्य, कार्यक्रमशून्य आघाडी.

इंदिराविरोधी आघाडी ही केवळ उजव्या पक्षांची आघाडी आहे असा प्रचार इंदिरा-कॉंग्रेसचे नेते नेहमी करीत आलेले आहेत. त्याला उत्तर म्हणून आपल्या आघाडीत इतर पक्षांनाही सामील करून घेण्याचे प्रयत्न निजलिंगप्पा करीत आहेत. संयुक्त समाजवाद्यांना आत आणण्यासाठी त्यांनी आघाडीचे मूळ स्वरूप बदलले व कार्यक्रमावर एकमताचा आग्रह सोडला. ‘इंदिरा हटाव आघाडी’ असे या आघाडीचे वर्णन एका संयुक्त समाजवादी नेत्याने केले.

या आघाडीत येऊ शकणारा आणखी एक पक्ष म्हणजे भारतीय क्रांती दल. त्याचे नेते चरणसिंग यांच्याशी निजलिंगप्पा व संयुक्त समाजवादी नेत्यांनी बोलणी केली, पण निवडणुकीत कोणत्याही पक्षाशी युती किंवा आघाडी करावयाची नाही असा निर्णय भारतीय क्रांती दलाच्या कार्यकारिणीने घेतला आहे. राज्यशाखांना मात्र समझोता करण्याची मोकळीक दिली आहे. तत्त्वनिष्ठ भूमिकेचा आव आणून युतीला बाह्यतः विरोध करावयाचा, पण प्रत्यक्षात राज्यपातळीवर ती करावयाची असे या मागचे खरे धोरण आहे. भा.क्रां.द. स्वतःला अखिल भारतीय पक्ष म्हणवीत असला तरी त्याचे खरे वजन मुख्यतः उत्तर प्रदेशात व त्याखालोखाल बिहारमध्ये असून इतर ठिकाणच्या शाखा नाममात्र आहेत. आघाडीसाठी ताणून धरण्यात चरणसिंगांचा उद्देश जास्तीत जास्त फायद्याची सौदेबाजी करून आपल्या पक्षाच्या

पदरात जास्तीत जास्त जागा पाडून घेणे हा आहे.

कार्यक्रमाशिवाय आघाडीची कल्पना मसानींना पसंत नसली तरी इंदिराविरोधी आघाडीत सामील होण्याशिवाय त्या पक्षाला गत्यंतर नाही. कारण एकट्याच्या बळावर स्वतंत्र पक्ष फारसे यश मिळवू शकणार नाही.

हे इंदिराविरोधी पाच पक्ष अखिल भारतीय पातळीवर अजून एकत्र आले नसले तरी राजस्थानात त्यांनी एकत्र येऊन निवडणुका लढविण्याचे ठरविले आहे. राजस्थानात संस्थानिकांचे वजन मोठे आहे. त्यांच्या पाठिंब्याने लोकसभेच्या बहुसंख्य जागा आपण मिळवू असा विश्वास आघाडीच्या नेत्यांना वाटत आहे.

## बिहार व तेलंगण

दरम्यान इंदिरा-काँग्रेसला प्रतिकूल अशा दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. बिहारमधील इंदिरा-काँग्रेस पक्षातील गटबाजी पक्षाच्या चांगलीच मुळावर येणार असे दिसते. दरोगाप्रसाद सरकार गडगडल्यानंतरही एकमेकांचे पाय ओढण्याच्या राजकारणातच तेथील प्रांतिक नेते गढलेले आहेत. कार्यकारिणीने सादर केलेली उमेदवारांची यादी एल. एन. झा यांच्या गटास पसंत नाही. त्यांनी दुसरी यादी सादर करण्याचे ठरविले. 'प्रदेश काँग्रेस मृतवत झाली आहे. तिची यादी आमच्यावर बंधनकारक नाही' असे स्पष्टच उद्‌गार दुसऱ्या एका नेत्याने काढले. एका बाजूला विरोधी पक्षांची आघाडी व दुसऱ्या बाजूस स्वतःच्या पक्षातील गटबाजी यामुळे बिहारमध्ये इंदिरा-काँग्रेसला यशाचा संभव फार थोडा आहे.

तेलंगण प्रजासमितीच्या नेत्यांशी झालेल्या इंदिरा गांधींच्या वाटाघाटी फिसकटल्या ही दुसरी घटना. तेलंगण १९७७ पर्यंत आंध्रमध्ये राहील व नंतर तेथील दोन तृतीयांश प्रतिनिधींनी वेगळ्या राज्याच्या बाजूने मत दिल्यास त्याचे वेगळे राज्य होईल. अशी इंदिरा गांधींची योजना होती. पण ७२ च्या पुढे थांबायला तेलंगण नेत्यांची तयारी नाही. लोकसभेच्या निवडणुका स्वतंत्रपणे लढविण्याचे तेलंगण प्रजासमितीने ठरविले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर १९५७ साली समितीने महाराष्ट्रात जसा विजय मिळविला तसा विजय मिळवून तेलंगण प्रजासमिती तेलंगणातील बहुसंख्य जागा जिंकण्याचा संभव आहे.

तामिळनाडू सरकारने विधानसभा बरखास्त केली व लोकसभेच्या निवडणुकीबरोबरच विधानसभेच्या निवडणुका घेण्याचे ठरविले. विधानसभेत द्रवीड मुन्नेत्र कळघमला निर्विवाद बहुमत असता करुणानिधींनी हा निर्णय का घेतला? केवळ लोकसभेच्या निवडणुका झाल्या तर त्यात आपला पक्ष पूर्वीइतक्या जागा मिळवील अशी खात्री त्यांना वाटत नसावी. प्रांतिक स्वायत्ततेच्या प्रादेशिक आवाहनाच्या जोरावरच त्यांच्या पक्षाने गेल्यावेळी विधानसभा व लोकसभा निवडणुकात प्रचंड यश मिळविले. लोकसभेच्या २५ जागा या पक्षाने जिंकल्या होत्या. इंदिरा-काँग्रेसला बहुमतासाठी सध्याप्रमाणेच आपल्या पाठिंब्यावर विसंबून रहावे लागावे यासाठी

गेल्यावेळेसारखेच यश याही वेळी मिळविणे करुणानिधींना आवश्यक वाटते. यासाठीच विधानसभा निवडणुकांचा घाट त्यांनी घातला आहे.

ओरिसामध्ये स्वतंत्र पक्ष व जनकाँग्रेस यांची संयुक्त आघाडी मोडल्यामुळे तेथेही विधानसभेच्या निवडणुका होणे अटळ दिसते. या आघाडीतून जनकाँग्रेसला फोडण्याच्या इंदिरा-काँग्रेस नेत्यांच्या कारवाया यशस्वी झाल्या. जनकाँग्रेस, प्रजासमाजवादी यांच्या पाठिंब्याने तेथे विधानसभेत आपण बहुमत मिळवू व लोकसभेच्याही बऱ्याच जागा मिळवू अशी आशा इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांना वाटत आहे.

निवडणुका २६ फेब्रुवारी ते ४ मार्च पर्यंत होणार आहेत. उमेदवार निवडीच्या कामात राजकीय पक्ष गढले असून पंधरा जानेवारीपर्यंत ते काम पुरे होईल.

## जनसंघाचे वाढते बळ

इंदिराविरोधी आघाडीची बोलणी पुरी होऊन जागांचे वाटप ठरण्यापूर्वीच जनसंघाने आपण मध्य प्रदेशातल्या सर्व ३७ जागा, महाराष्ट्रातल्या १६, पश्चिम बंगालमधील ३, त्रिपुरा १, मणिपूर १ व आसाम १ अशा ५९ जागा आपण लढविणार असे जाहीर केले. एवढेच नव्हे तर मतदारसंघही जाहीर करून टाकले. ही घाई टिकाऊ युती निर्माण होण्याचे दृष्टीने योग्य नव्हती.

या जागा जाहीर करताना जनसंघाने कोणता निकष लावला? गेल्या लोकसभा निवडणुकीतील निकालांची छाननी केली तर काय दिसून येते? लोकसभेसाठी जनसंघाने २५१ उमेदवार उभे केले होते. त्यापैकी ३५ निवडून आले व ११३ जणांची अनामत रक्कम जप्त झाली. त्यापूर्वीच्या १९६२ च्या निवडणुकीत जनसंघाच्या एकूण १९६ उमेदवारांपैकी ११४ जणांची अनामत रक्कम जप्त झाली होती. लोकसभेच्या चार निवडणुकात जनसंघास मिळालेल्या जागांची संख्या ३, ४, १४, ३५ आणि मतांची टक्केवारी ३·१०, ५·९३ ६.४४ व ९·३३ अशी वाढली. जनसंघाच्या वाढत्या बळाचे हे निदर्शक आहे यात शंका नाही. पण त्याचबरोबर जनसंघाच्या वास्तविक बळाची कल्पना येण्यासाठी किती उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या त्याची आकडेवारीही लक्षात घेतली पाहिजे. मतदारसंघात आपले वजन असो–नसो, निवडून येण्याची शक्यता असो–नसो, उमेदवार मोठ्या संख्येने उभे करावयाचे त्यामुळे मतांची टक्केवारी वाढते हे जनसंघाचे निवडणुकीबाबतचे धोरण आहे. याच धोरणानुसार यावेळी २३५ जागा लढविण्याची भाषा जनसंघाचे नेते बोलत आहेत व महाराष्ट्रात १६ जागा त्यांनी जाहीर केल्या आहेत.

जनसंघाच्या इतर राज्यातील जागांचा विचार करण्यापूर्वी महाराष्ट्रातील जागांचा विचार करूया. गेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील २९ जागा जनसंघाने लढविल्या त्यापैकी एकही जिंकली नाही. आठ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली. जनसंघाने यावेळी ज्या सोळा जागा निवडल्या आहेत त्या सर्व गेल्यावेळी काँग्रेसने जिंकल्या होत्या. यापैकी नाशिक, खामगाव, अकोला व पुणे

या चार जागा तर जनसंघाने १९६७ साली लढविल्याही नव्हत्या. यापैकी फक्त पुण्याची जागा जनसंघाचे धोरण म्हणून सोडली होती. विरोधीपक्षांचे अखिल भारतीय नेते जेथे उभे असतील तेथे काँग्रेसशी यांचा सरळ सामना होऊ द्यावयाचा. इतर विरोधी पक्षांनी उमेदवार उभे करावयाचे नाहीत असा संकेत विरोधी नेत्यांनी ठरविला होता. त्यानुसार पुण्यात एस्. एम्. जोशींविरुद्ध जनसंघाने उमेदवार उभा केला नाही व जनसंघाच्या जगन्नाथराव जोशींविरुद्ध इतर विरोधी पक्षांनी उमेदवार उभा केला नव्हता. पुण्याशिवाय इतर तीन जागा मात्र पक्षाचे त्या भागात काही वजन नसल्यानेच जनसंघाने लढविल्या नव्हत्या. कदाचित तेथे उमेदवार मिळणेही जनसंघास कठीण गेले असावे. पण यावेळी या जागा जनसंघ लढविणार आहे.

उमेदवाराची अनामत रक्कम जप्त होणे हा त्याला व त्याच्या पक्षास मतदारसंघात काही स्थान नसल्याचा बोलका पुरावा असतो. नांदेड व सांगली या मतदारसंघात गेल्यावेळी जनसंघाच्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली होती. तरी या जागा जनसंघ पुन: लढविणार आहे. कोणत्याही पक्षाशी समझोता न करता केवळ आपल्या बळावर निवडणुका लढविण्याचे जनसंघाचे धोरण असते तर त्याच्या या निर्णयावर कोणी टीका केली नसती. पण इंदिरा-काँग्रेसला पाडण्यासाठी इतर विरोधी पक्षांशी समझोता करण्याची भूमिका जनसंघाने घेतली आहे. अशा वेळी जागा वाटप ठरविताना त्या मतदारसंघातील इतर विरोधी पक्षांचे बळही लक्षात घेतले पाहिजे. गेल्यावेळी नांदेडमध्ये रिपब्लिकन पक्षाला व सांगलीत शे. का. पक्षाला दुसऱ्या क्रमांकांची मते मिळाली होती. इंदिरा–काँग्रेसचा पराभव करण्याचे दृष्टीने रिपब्लिकन पक्षाला काँग्रेसपासून अलग काढून विरोधी आघाडीत आणण्याचे प्रयत्न विरोधी नेत्यांनी करावयास हवेत. त्यात यश आलेच तर जागा वाटपामध्ये नांदेडची जागा रिपब्लिकन पक्षास देणेच योग्य होईल. गेल्यावेळचे मतदानाचे आकडे पहाता सांगलीच्या जागेवर शे. का. पक्षाचा अधिक हक्क आहे. महाराष्ट्रात काही भागात या पक्षाचे वजन आहे. विधानसभेत तो सर्वात मोठा विरोधी पक्ष आहे. इंदिरा–काँग्रेसचा पराभव करण्याचे दृष्टीने या पक्षाशीही विरोधी नेत्यांनी महाराष्ट्रापुरता समझोता करावयास हवा.

## नंदुरबार, बुलढाणा, रत्नागिरी

जनसंघ लढविणार असलेल्या इतर दहा जागांमध्ये नंदुरबार, बुलढाणा व रत्नागिरी या तीनच मतदारसंघात त्या पक्षास गेल्यावेळी दुसऱ्या क्रमांकांची मते मिळाली आहेत. तेथे उमेदवार उभा करण्याचा त्यास रास्त हक्क आहे. मुंबई ईशान्य, चिमूर व जालना या मतदारसंघात जनसंघास गेल्यावेळी तिसऱ्या क्रमांकांची मते मिळाली आहेत. मुंबई ईशान्यमध्ये डावे गट, चिमूरमध्ये रिपब्लिकन व

पृष्ठ ४० वर

# हे कलकत्ता !

## सौ. तारा पंडित

### पत्रोत्तर

...'पश्चिम बंगालमध्ये दृढनिश्चयी परंतु चुकीच्या मार्गाचा अवलंब करणारा एक लहानसा गट. संख्येने मोठचा पण वृत्तीने सहनशील असणाऱ्या समाजाला लीलेने घाबरवून सोडीत आहे. चार तरुण एकत्र येतात, शैक्षणिक संस्थांमध्ये लूट-मार करतात, पुतळे तोडतात, आणि पोलिसांना एकेकटे गाठून त्यांचेवर मागून हल्ला करतात...असली निर्घृण कृत्ये जगात कुठेही दिसत नसतील. या कृत्यांना अजूनही आळा घातला जात नाही. सामान्य माणसाला हे सारे उघड्या डोळ्यांनी बघावे लागते. आता तरी प्रत्येक विभागातून लोकांनी एकेक समिती स्थापन करावी आणि स्वतःला क्रांतिकारी म्हणवून घेणाऱ्यांचा प्रतिकार करावा.'

वरील आशयाचं एक पत्र एका दैनिक वर्तमानपत्राने प्रसिद्ध केलं आणि त्यानंतर दोनच दिवसांनी त्याच वर्तमानपत्रात पहिल्याच पानावर म्लान चेहऱ्याची एक असहाय तरुणी व तिची चार दुर्दैवी मुले यांचा फोटो प्रसिद्ध झाला. ह्या बाईचा नवरा श्री. बाचा हा एका पोलीस–अधिकाऱ्यावर नक्षलवादी हल्ला करीत आहेत हे पाहून पोलिसाला वाचवण्याच्या उद्देशाने त्या ठिकाणी येताच जिवानिशी मारला गेला.

आता पश्चिम बंग सरकारने श्री. बाचा यांच्या पत्नीला दहा हजार रुपये नुकसानभरपाई म्हणून देण्याचे ठरविले आहे.

### ट्रेनिंगची व्यवस्था

कलकत्त्यातील एका व्यक्तीला महाराष्ट्रातून एक पत्र आलं–जिवाभावाच्या मित्राचं. त्या पत्रासोबत छोटया बाळाचा एक फोटो होता. फोटोतल्या चेहऱ्यावर मिस्किल हास्य होतं. नवी पिढी ना! पत्रात फोटोबद्दल बापाने लिहिलं होतं– 'बेबीच्या बंडखोरपणाचा हा अगदीच मवाळ नमुना. माझ्यामते तिने नक्षलवादीच व्हायला हवं.'

हे सगळं वाचून झाल्यावर कलकत्त्याचा मित्र पत्राचं उत्तर लिहायला बसला. दोन-तीन दिवसांपूर्वीचं वर्तमानपत्र कागदाच्या खाली ठेवायला त्याने घेतलं. एका जाड टाईपातल्या वाक्याकडे सहज त्याची नजर वेधली गेली. त्या वाक्याने माणसाला

जणू स्फूर्ती आली. पत्रोत्तरात त्याने लिहिलं–

'आपली बेबी नक्षलवादी व्हावी असं तुला खरंच मनापासून वाटतं का? तसं असेल तर तिला इथे पाठवून दे. ट्रेनिंगची व्यवस्था मी करीन. कारण नुकतंच वर्तमानपत्रातलं एक वाक्य मी वाचलं ते असं–

'Naxalites are regularly trained in W. B.'

## नामी युक्ती!

एका कॉलेजच्या गच्चीवरून बाँबफेक झाल्यामुळे सारी मुले पळत सुटली. जो तो आश्रयासाठी सुरक्षित जागा शोधू लागला. याच गडबडीत तीन-चार विद्यार्थी जवळच असलेल्या एका पुस्तकाच्या दुकानात घुसले. मालक चहा पीत बसला होता. गिऱ्हाईक आलं असं समजून तो तत्परतेने उठला. कुठली पुस्तके हवीत अशी आस्थापूर्वक त्याने चौकशी केली. मुलांनी दुकानात घुसण्याचा आपला उद्देश सांगितला. दुकानदार म्हणाला, 'मग बसा इथे. माझी हरकत नाही.' आणि नोकराला हाक मारून चहाची ऑर्डर दिली. चहाबरोबर गप्पा सुरू झाल्या. थोड्याच वेळात त्या मुलांची दुकानदाराशी चांगलीच गट्टी जमली. असाच काही वेळ गेला. दुकानदाराला कसली तरी चाहूल लागली. म्हणून त्याने आपल्या टेबलाचं ड्रॉवर उघडलं, आणि ब्रेडचा एक तुकडा काढून टेबलावर ठेवला. तेवढ्यात एक उंदीर पुस्तकांच्या शेल्फवरून टुणकन् उडी मारून टेबलावर आला-आणि मजेत ब्रेड खाऊ लागला. मुलांना मोठी गंमत वाटली. एकाने उंदराकडे बोट दाखवून विचारलं,

'हा...पाळलेला आहे?'

'म्हटलं तर पाळलेला आहे, म्हटलं तर नाही.' दुकानदार हसत उत्तरला. मुलांना अर्थबोध होईना. मग दुकानदारानेच स्पष्टीकरण केलं––

'असं आहे, एकदा दुकानात चार-पाच उंदीर आले आणि पुस्तकांच्या शेल्फमधील नवीकोरी पुस्तकं कुरतडू लागले, खाऊं लागले. मी पिंजरा ठेवून पाहिला पण ते चलाख उंदीर दाद देईनात. मग मी हा प्रयोग करू लागलो. चांगली ताजी ब्रेड त्यांच्यासाठी आणू लागलो व त्यांना खाऊ घालायला सुरुवात केली. ब्रेड दिल्यावर उंदरांनी पुस्तकांकडे दुर्लक्ष केलं आणि एकदा चांगलं पोट भरल्यावर ते कशाला पुस्तकं कुरतडतील?... सध्या दोन उंदीर आहेत. पुस्तके सुरक्षित रहावीत म्हणून मी त्यांचा चरितार्थ चालवीत असतो.'

□ □ □

# वर आभाळ आहे, खाली धरती...

महादेव मोरे

अशाच एका उमलत्या सकाळी मी तिला प्रथमच पाहिली. सकाळच्यावेळी एखादं जाईचं फूल उमललेलं डहाळीवर दिसावं, तशी ती दिसत होती. ताजी. टवटवीत. प्रसन्न.

तिच्या अंगावर किरमिजी फुलं असलेलं पांढरं जॉर्जेटचं पातळ व फिक्कट गुलाबी ब्लाऊज होता. तिच्या गोऱ्यापान अंगकांतीला तो पोषाख फार खुलून दिसत होता. गरोदरपणाने भारावलेले, अवघडलेले शरीर सावरीत ती चालली होती. हाती प्लॅस्टीकची जाळीदार पिशवी होती; मार्केटिंगसाठी जात असावी.

गावात कुणी ना कुणी तंबाखूचे ऑफीसर बदली होऊन येतात. अशाच एखाद्या ऑफीसरची ती पत्नी असावी. प्रथमदर्शनी तिच्या व्यक्तिमत्त्वाची अशीच काहीशी छाप माझ्यावर पडली.

गावाच्या एका टोकास असलेल्या त्या माळभागात मी रहात होतो. सोबत दोघे पार्टनर्स. दुमजल्यावरील एक खोली आम्हास मिळालेली. जेवणे, कॉलेजला जाणे, उरलेल्या वेळात गप्पा मारणे व लहर फिरली तर अभ्यास करणे–हे आमचे नित्यक्रम होते.

ह्या माळभागात वस्ती तशी खूप विरळ होती. कुणी नवीन रहायला आलं तर सहसा ते नजरेआड होत नसे...अशांसंबंधी आमच्यात मग चर्चा घडणं अपरिहार्य होई...तशी ती झालीही...ती आल्याने आमच्या गप्पांच्या विषयात एकाने भरच पडली.

आमच्या खोलीपुढून गेलेला रस्ता गावाच्या मध्यवस्तीत जात असल्याने त्या रस्त्यानेच इतरांसारखी आमचीही रहदारी चाले. असाच एक दिवस. आम्ही कॉलेजला जात होतो; मध्येच मित्राने डिवचून म्हटले,

"अरे, ते पहा..."

त्याच्या इशाऱ्याच्या अनुरोधाने आम्ही पाहिले–एक झोपडीवजा घर. त्याचीच

एक खोली आणि त्या खोलीच्या दारात ती बसली होती...ती, तिचं सौंदर्य, तिचा नीटस–नेटका पोषाख व त्या झोपडीची खोली हे परस्परांना किती विसंगत दिसत होतं !

तिच्या पुढ्यात सूप होतं आणि सुपातील तांदुळ निवडीत ती बसली होती. नजर सुपावरच. तांदूळातून फिरणारी तिची गोरीपान बोटे किती आरक्त दिसत होती ! जणू जास्त जोराने ती तांदूळातून फिरली असती तर रक्तच गळले असते ! एखाद्या कुशल चित्रकाराने रेखाटलेल्या चित्रकृतीसारखी ती दिसत होती–सुंदर, रेखीव, सौज्वळ नि घरंदाज...

तिचा गळा मंगळसूत्राविना रिकामा–रिकामा दिसत होता...कदाचित् ती विधवा असेल...असेल... ?



दरवेळी त्या अनामिकेबद्दल नवीन प्रश्न उभे रहात होते...कुतूहल वाढवीत होते अन् का कोण जाणे—अस्वस्थही करीत होते...

बाहेरून कोठूनसा एक पन्नाशीचा, काटकोळासा गृहस्थ आला; आणि तिच्यासमोर उभा राहून म्हणाला,

"अजूनीही स्वैंपाक झाला नाही होय ग ? काय करीत होतीस सकाळपासून?"

त्याच्या आवाजात चीड होती, त्रागा होता, रागही...

तो तिचा बाप असावा...आणखी त्याच वयाचा एक माणूस चार-आठ दिवसाला त्या खोलीत दिसायचा; तोही असाच कुणी पाहुण्यापैकी असेल...

तिच्याविषयी खोलीतील पार्टनर्समध्ये बोलणे होई...सुरवातीचा आदर आताशा खूपच कमी होऊन असे बोलणे बऱ्याचं खालच्या पातळीवरून चालत होते.

"असेल कुणीतरी छटेल कॉलेजकन्या...मजा मारलेली गळ्याशी आल्यावर बापाने ह्या अनोळखी गावी आणली असेल—रिकामी करायला !"

"नाहीतर सुरवातीला आपण बुद्दूच ठरलो होतो...तिच्याविषयी काय व किती समज करून घेतले होते ! पण ही शेवटी एक चवचाल, उनाड पोरटी निघाली !"

तर्क, अंदाज व ठाम निष्कर्ष—अशी सगळ्यांची गल्लत, एक विचित्र मिश्रण होई; अन् ते चिवडत सारे बसत...अशा ग्राम्यगप्पांमध्ये त्यांना कसले सुख मिळत होते, कोणास ठाऊक ! पण मला ते सर्व ऐकू नयेसं वाटे...अंगावर टपटपा झुरळं पडावीत तसं काहीसं किळसवाणं वाटे. मन मलीन होऊन जाई...

एकदा आम्ही गावाबाहेरील तळ्याच्या काठी फिरावयास गेलो होतो. रात्रीचा आठचा सुमार झाला, तसे आम्ही परतलो. पाच-सहा पावले चालून जातो तोच कानावर हुंदक्याचा आवाज आला. आवाज स्त्रीचा होता. स्फुंदत, हुंदके देत 'मी नाही हो...नाही हो !' असे ती म्हणत होती. आणि कुणी पुरुष तिला मारीत होता...आवाजाच्या रोखाने आम्ही निघालो...मारता—मारता तो पुरुष तोंडाने अर्वाच्य शिव्या देत होता. स्त्री-पुरुष संबंधावरच्या त्या शिव्या ऐकतानाच अंगावर विचित्र शिरशिरी उठत होती. कुणीतरी आपणालाच नागवं करतं आहेसं वाटत होतं...

"रांड, इथं का आली होतीस—ह्यावेळी ? सांग—का आली होतीस ? यजमानाखाली..." आणि असेच...

आम्ही जवळ जाऊन पोहचण्यापूर्वीच आम्हासारखेच तिघे-चौघे तेथे जमले होते...'काय ते, काय ते...? काय झालं ?' विचारत होते...एवढ्यात एक कार फरारात आली; अन् बाजूच्या वळणावरून एक ऐटबाज वळण घेऊन निमिषार्धात निघून गेली...कारच्या हेड्लाईट्सचा प्रकाश क्षणकाल त्या साऱ्या परिसरावरून फिरला...त्या अवधीत जे दिसायचं ते दिसलं आणि एक धक्काच बसला...

ती दुर्दैवी स्त्री म्हणजे ती अनामिका होती. आणि तिला शिव्या देणारा, मारणारा दूसरा तिसरा कुणी नसून तिचा बापच होता !

अजूनीही कुणीसं 'काय ते ? काय ते ?' असे प्रश्न विचारत होतं...त्याला तेथील दुसरं कुणीतरी उत्तर दिलं,

"काय ते–काय ते म्हणजे काय ? एक अवा नि एक अप्पा; दुसरं काय ! चला, त्यांचं खाजगी काय असेल ते असेल; आपण काय पहायचं नि ऐकायचं !"

हे परखड बोलणं ऐकून सारे मार्गस्थ झाले. मध्ये पडून सोडविण्याची उर्मीही विरली; इतरांसारखे आम्हीही परतलो...

लोक जमल्याचे पहाताच तिच्या बापाने हात आखडता घेतला होता...

"चल !" त्याने फर्मावले.

त्या हुकूमाचा एक दोर बनला, गळयात पडला, आणि त्याच्यामागून फर-फटल्यासारखी ती निघाली...अवघडलेल्या शरीरानं तिला धडपणे चालणंही जमत नव्हतं...

असाच एक रविवार. पार्टनर्स मॅटिनीला गेले होते. जाण्यापूर्वी मलाही आग्रह केला गेला होता. तसे मी दोन-तीन स्पाय चित्रपट पाहिले होते; पण ते ठरीव ठशाचे असल्याने मला ह्या नव्या स्पाय् फिल्ममध्ये तसे काहीच औत्सुक्य नव्हते... मी खोलीवर राहिलो होतो; कसलेसे मासिक चाळत कॉटवर पडलो होतो... असाच काही वेळ गेला, आणि दारात कुणाची तरी सावली पडली...मासिकातील नजर दाराच्या दिशेने धावली; अन् मी चमकलोच !

दारात ती उभी होती...अविश्वसनीयता, आश्चर्य, अनपेक्षितता...मी गुर-फटला गेलो...त्या चमत्कारिक अवस्थेत काय बोलावं, सुचलं नाही; तरी पण अभावितपणे उठून बसलो...

"आत येऊं का ?" माझ्याकडे स्थिर नजरेने पहात तिनं विचारलं.

लहान मुलींच्या आवाजात असतो, तसा एक प्रकारचा कोवळेपणा तिच्या आवाजात होता. व्यवहारी जगाचे कठोर आघात झाले नाहीत अशा व्यक्तींच्या आवाजात असाच बालीशपणा असतो. ती पण अशांपैकीच वाटत होती.

"या...या ना !" मी म्हटलं.

तशी ती आत आली. फार दिवसाची ओळख असावी तशी धीटपणे खुर्चीवर बसली, आणि ओळखीचं माणूस म्हणतं तशाच आवाजात म्हणाली,

"माझं एक काम होतं तुमच्याकडं..."

माझी मुद्रा प्रश्नार्थक झाली.

"मला तीस-एक रुपये हवे होते..."

याचकाच्या आवाजात एक प्रकारचं अडखळतेपण असतं. पण तिच्या आवाजात तसं काहीच नव्हतं. स्वच्छ, स्पष्ट आवाजात ती मागणी करीत होती. जणू मीच

तिचे काही देणे लागत होतो. मी पैसे देणारच आहे, अशी ठाम समजूत तिने का करून घेतली होती कोणास ठाऊक ! तसे जमते तरी कसे ? इतके ठाम, सरळ, स्पष्ट नि थेट वागणे !

" अर्थात् हे पैसे मला परत करणे जमणार नाही !"

अजूनही मी आश्चर्यातच...

" पण माझ्याकडे हा मुगवट आहे—अर्ध्या तोळ्याचा; सराफ कट्टयावर तो विकून तुम्हाला तितके पैसे सहज मिळू शकतील..."

आपण असेच गप्प बसलो तर हिची आणखी काय-काय समजूत होईल कोणास ठाऊक; म्हणून म्हणालो,

" हे पहा, मी विद्यार्थी; माझ्याकडे इतकी रक्कम कशी असणार ? आता फक्त वीस एक रुपये माझ्याकडे आहेत, इतकेच !"

" काही हरकत नाही; तेवढे द्या मला; चालतील !"

तिच्या व्यक्तिमत्त्वात अशी कोणती जबरदस्त शक्ती होती, कोणास ठाऊक; पैसे देऊ नयेत असे मनोमन वाटत असतानाही मी उठलो; आणि ट्रंक उघडून तिच्या हातावर वीस रुपये ठेवता ठेवता म्हणून बसलो,

" तुमचा हा मुगवट परत घ्या. तुम्हाला पैशाची गरज आहे ना ? घेऊन जा..."

" तुमची ना ओळख ना पाळख, तरीही...तरीही हे असेच कसे घेऊ ?"

" माझी ओळख वगैरे नव्हती तरी पण तुम्ही पैसे मागण्यास कशा आलात ?"

" ह्या भागात वस्ती विरळ; तीही विशेषतः गरीबांची......सराफकट्या-वर जाऊन येण्याइतका मला वेळही नव्हता; मनात आले, विद्यार्थ्यांच्याकडे गावाकडून फीसाठी वगैरे आलेले पैसे असतात, एखाद्यावेळी मिळूही शकतील... वर आले; ह्या खोलीचं दार उघडं दिसलं आणि...," आणि क्षणकाल थांबून ती म्हणाली, " मला वाटते, माझा रस्ता चुकलेला नाही. निदान तुमच्याकडून नकार तरी मिळाला नाही !"

" समजा, मिळाला असता तर...?"

" मी परत माझ्या तुरुंगाकडे गेले असते..."

" बापाच्याजवळ रहाण्याला तुरुंग समजता तुम्ही ?"

" बाप...?" क्षणभर तिच्या डोळ्यात द्वेष साकळला, अन् मग तो निवळत गेला, आणि स्वाभाविक आवाजातच ती बोलू लागली, " तो हरामी माझा बाप असता तर माझ्या आयुष्याची अशी ही परवड कशाला झाली असती...? मला माझी आई माहीत नाही की बाप ठाऊक नाही...ह्या माणसाने मला लहानाची मोठी केली, आणि...आणि अनेकवेळा अंगाखाली ओढून बटीक करून टाकले... एवढच करून तो थांबला नाही; तर त्याने पैशासाठी अनेकांखाली मला घातले...

अकराव्या वर्षी मी वयात आले, आणि तेव्हापासून गेल्या नऊ वर्षांत असे जीवन जगले की, जगात काही पवित्र गोष्ट असते, ह्यावरचा विश्वासच उडून गेला... मनाविरुद्ध अनेक बलात्कार, आणि गर्भपातही...आताचा हा गर्भ टिकून आहे, तो कधीमधी खोलीत दिसतो ना, त्या नव्या यजमानाच्या कृपेने ! त्याला मूल हवंय् म्हणे ! तो यजमानाचं नातं मिरवतो, आणि हा बापाचं...जगाला सांगतो, 'ही माझी मुलगी.' आणि अशा ह्या बापाची अशाही अवस्थेत वासना भागवावी लागते मला ! परवा तळ्यात पडायला गेले, तर ह्यानं पकडून आणलं, मी माझ्या नशिबाला रड रड रडले, तर रडतानाही तू खूपच सुंदर दिसतेस, म्हणत त्याने त्या रात्रीही आपली पापी भूक भागवून घेतली...हे असं माझं जीणं आहे... आजवर कुणाजवळ बोलले नव्हते; आज तुम्हापुढं भडाभडा बोलून रिकामी झाले बघा ! का ? कदाचित सांगता येणार नाही मला, पण माझा उपभोग न घेता मला पैसे देणारे तुम्हीच पहिले भेटलात, म्हणून असेल, किंवा तुमची निर्व्याज वृत्ती पाहून असेल किंवा असेच काही अनाकलनीय कारण असेल, मलाच ते पुरेसे कळले नाही अजूनही...पण...पण मजसंबंधी काहीही माहिती नसताना तुम्ही ही मदत केलीत, हे तुमचे ऋण मी कधीही विसरणार नाही...कधीही..."

तिच्या बोलण्याने सुन्नसा झालो. व्यवहारी जगापासून कोसो योजने दूरवर असलेले माझे विद्यार्थ्याचे जग तिच्या बोलण्याने गदगदा हलविले गेले, अन् मला कुठल्या कुठे फेकून दिले ! तशाही अवस्थेत मी तिला विचारले,

"पण...पण...तुम्ही हे पैसे घेऊन काय करणार आहात ? कुठेतरी जाऊन पुन्हा परवाचेप्रमाणे आत्महत्येचा प्रयत्न ?"

"तो एक खुळेपणा झाला...पुन्हा मी तसे करणार नाही...मी ह्या हरामी माणसाच्या पंजाखालून निसटणार...दूर कुठेतरी निघून जाणार..."

"पण कुठे...? कुठे जाणार ह्या एवढ्या मोठ्या जगात ?"

"कुठे...? ते अजूनही माझे मलाच माहीत नाही नि तुम्हाला कशी सांगू ?" आणि विचित्रशी हासत ती म्हणाली, "वर आभाळ आहे, खाली धरती; आपण फक्त निघायचं...कुठेतरी मार्ग गावेल, ठिकाणा सापडेल, आसरा मिळेल..." एवढे बोलून ती उठली नि म्हणाली, "जाते मी..."

मी वर पाहिले, तेव्हा ती पाठमोरी झाली होती...जिना उतरत होती...ती दिसेनाशी झाली तरी तिचे शब्द मनात घुमत राहिले – 'वर आभाळ आहे, खाली धरती...वर आभाळ आहे, खाली धरती...'

□ □ □



# पर्ल हार्बर

विनय कुबेर

लेखांक : चार

जुना नावाजलेला चिनी राजनीतीतज्ज्ञ सांगतो 'शत्रूने गाफीलपणे एखादा दरवाजा उघडा टाकला तर त्यातून शत्रूच्या घरात घुसणे हे तुमचे प्रथम कर्तव्य होय.' जपानी लोकांवरही याच विचारसरणीचा प्रभाव होता. अमेरिकनांनी हवाईच्या दरवाजात थोडी फट ठेवली. त्याचा फायदा घेऊन जपानी आणखी हेरगिरीसाठी आत घुसले !

अमेरिकेने जपानी जहाज वाहतुकीवर घातलेली बंदी उठवावी यासाठी टोकियो सरकारने सप्टेंबरमध्ये प्रयत्न सुरू केले. अमेरिकेतील जपानी वकील किशिसाबुरो व

अमेरिकन परराष्ट्रखात्याचे सचिव कॉर्डेल हल यांच्यात कित्येक आठवडे बोलणी सुरू होती. ती यशस्वी झाली. जपानच्या तीन प्रवासी जहाजांना जपान-हवाई-अमेरिका असा प्रवास करून त्याच मार्गाने परतण्याची परवानगी मिळाली. जहाजावरून व्यापारी माल नेण्यास मात्र मनाई करण्यात आली. तंग परिस्थिती निवळण्यास मदत व्हावी यासाठी अमेरिकेने ही सवलत देऊ केली. जपानच्या मनात काही वेगळाच हेतू आहे याचा अंदाज अमेरिकन सरकारला आला नाही. सुन त्झुच्या पौर्वात्य तत्त्वज्ञानाचा पगडा असलेल्या जपानने मात्र याचा पुरेपूर फायदा उठविण्याचे ठरविले.

'ताटुता मारू' हे पहिले जपानी जहाज २३ ऑक्टोबरला हवाईला पोचले. ते धक्क्याला लागताच कौन्सल जनरल किटा त्यावर गेला. कप्तानाने एक सीलबंद खलीता त्याच्या हाती दिला. हा गुप्त खलीता नौसेनापती मंडळाकडून (नेव्हल जनरल स्टाफ) आला होता. ओहू येथील लष्करी उभारणी, तिचा विस्तार, स्थान व सामर्थ्य यासंबंधी माहिती देणाऱ्या विस्तृत नकाशाची मागणी त्यात केली होती. ही सर्व माहिती जपानला परत नेण्यासाठी पाठोपाठ खास दूत येतील अशी सूचनाही त्यात होती.

लेफ्टनंट कमांडर सुझुकी व लेफ्टनंट कमांडर मेजिमा या दोघांकडे ही खास दूतांची कामगिरी देण्यात आली. सुझुकीला पॅसिफिकमधील अमेरिकन विमान-सामर्थ्याची चांगली माहिती होती, तर मेजिमा हा पाणबुड्यांबाबतचा तज्ज्ञ होता. दोघांनीही पर्ल बंदरातील परिस्थितीचा आपापल्यापरीने अंदाज घ्यायचा होता; नंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर व्यक्तिशः स्वतंत्र निवेदने सादर करायची होती.

'ताटुता मारू' काही दिवस हवाईस थांबून अमेरिकेस निघून गेले. 'तायो मारू' या दुसऱ्या जहाजावरून सुझुकी व मेजिमा हवाईला पोचणार होते. हे जहाज हवाईहूनच जपानला परतणार होते. त्याचा अमेरिकेचा प्रवास रद्द का करण्यात आला असे वरचेवर विचारून परदेशी पत्रकारांनी जपान सरकारला भंडावून सोडले. प्रवासाची सोईस्कर योजना आखता यावी म्हणून असा बदल करावा लागला असे उत्तर देऊन पत्रकारांची तोंडे बंद करण्यात आली.

'तायो मारू' याकोहामा बंदरातून २२ ऑक्टोबरला प्रवासास निघाले. सुझुकी व मेजिमा यांपैकी कोणाचेही नाव प्रवाश्यांच्या यादीत नव्हते. सुझुकीला जहाजाचा हिशेबनीस व मेजिमाला जहाजाचा डॉक्टर अशा भूमिका देण्यात आल्या. बंदर दृष्टीआड होताच जहाजाने प्रवासाची दिशा बदलली. पर्ल हार्बरकडे जाण्यासाठी हल्लेखोर आरमाराने निश्चित केलेल्या उत्तरेकडील मार्गाने ते हवाई-कडे निघाले. सबंध प्रवासभर सुझुकी व मेजिमा यांनी पाळीपाळीने क्षितिजाचे निरीक्षण सुरू ठेवले.

हा मार्ग अपेक्षेपेक्षाही जास्त अनुकूल असल्याचे त्यांना आढळले. सबंध प्रवासात

एकही परके जहाज त्यांच्या दृष्टीस पडले नाही. ओहूपासून ८० मैलावर पोचेपर्यंत एकाही अमेरिकन टेहेळणी विमानाच्या दृष्टीस 'तायो मारू' पडले नाही.

शनिवार दिनांक १ नोव्हेंबर रोजी सकाळी आठचे सुमारास 'तायो मारू' संथपणे होनोलुलू बंदरात शिरले. त्याच्या आगमनासाठी आठवड्याच्या अखेरचा दिवस व हल्ल्याची पूर्वनियोजित वेळ मुद्दामच जुळवून आणली होती. जहाज अलोह मनोऱ्याजवळील धक्क्यावर नांगरून ठेवण्यात आले. ते बंदरात शिरत असता दोन्ही गुप्तहेर मागील भागातून गुप्तपणे पर्ल बंदर व आसपासचा परीसर दुर्बिणीतून न्याहाळीत राहिले.

बंदरात जहाजाचा मुक्काम पाच दिवस होता. सुझुकी व मेजिमा दोघांनाही जहाजावरून उतरून इतरत्र जाण्यास सक्त मनाई होती. अमेरिकन अधिकाऱ्यांना संशय आल्यास त्यांच्यावर बिकट प्रसंग ओढवला असता! किटाने जहाजास तीन वेळा भेट दिली. त्याच्यासमवेत असणाऱ्या मदतनीसांनी प्रत्येकवेळी जहाजावर गुप्त कागदपत्र आणले. अमेरिकन अधिकाऱ्यांनी अनपेक्षित झडती घेतली असती तरी किटाजवळ काहीच सापडले नसते. कनिष्ठ नोकरवर्ग नियमभंग करीत असता पकडला गेल्यास त्याचे काही ना काही स्पष्टीकरण देता आले असते.

किटाने योशिकावाला मात्र जहाजाजवळ फिरण्याचीसुद्धा मनाई केली. अमेरिकन गुप्त पोलिस त्याच्या मागावर असण्याचा दाट संभव होता. सुझुकीने किटाजवळ एक लांबलचक प्रश्नावली दिली होती. त्याची लेखी उत्तरे योशिकावाने द्यायची होती. ओहूमध्ये चोवीस तास जागता पहारा आहे काय? हल्ल्याच्या इशाऱ्यानंतर किती वेळात अमेरिकन सैनिक शस्त्रसज्ज होऊ शकतील? असे अनेक प्रश्न सुझुकीने विचारले होते. योशिकावाने बहुतेक सर्वांची आशादायक उत्तरे दिली.

अनेक लष्करी गुपिते, एक माहितीपूर्ण नकाशा व प्रश्नावलीची उत्तरे असे बरेच कागदांचे भेंडोळे योशिकावाने सुझुकीसाठी दिले. किटाच्या एका मदतनीसाने हा अमोल खजिना स्थानिक वृत्तपत्रांच्या रद्दी कागदात गुंडाळून घेतला. बंदराजवळील किनाऱ्यावर चक्कर टाकताना तो ही 'मौल्यवान रद्दी' घेऊन जहाजावर पसार झाला! हे काम पार पडल्यावर सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

५ नोव्हेंबरला 'तायो मारू' जपानकडे परत जाण्यास निघाले. होनोलुलूची पाण्यातील सरहद्द ओलांडताना अमेरिकन अधिकाऱ्यांनी प्रवाशांची कसून झडती घेतली. परंतु त्यांच्या सामानात अगर अंगावर कसलीही आक्षेपार्ह वस्तू सापडली नाही.

## गुप्त प्रयाण!

तयारीची घूमधाम आता वाढली. नोव्हेंबरच्या प्रारंभी फुशिडाने हल्ल्याची रंगीत तालीम घेतली. सर्व योजना प्रत्यक्ष युद्धासारखीच होती. ६ विमानवाहू

नौकांसह सर्व जहाजांनी योजिल्याप्रमाणे हालचाली केल्या. ३५० विमानांनी २०० मैलावरील लक्ष्यांवर हल्ला केला. पूर्वीच्या दोन तालीमी अयशस्वी ठरल्या होत्या. त्यामुळे यामामोटो चिंताग्रस्त होता. अपेक्षेप्रमाणे ही तालीम यशस्वी ठरली. यामामोटोला इतर कामे असल्यामुळे तो प्रात्यक्षिकास हजर नव्हता. त्याचे 'नगाटो' हे जहाज अमेरिकन जहाजाची भूमिका करीत होते. त्यावरुन मात्र संदेश चमकला, 'हल्ला उत्तम झाला!'

सर्व जहाजांवरील लहान होड्या, कोच, जादा खुर्च्या शोभेच्या वस्तू व अनावश्यक व्यक्तिगत सामान उतरवून टाकण्यात आले. सुरक्षितता व कार्यक्षमतेवर ज्यांच्याविना परिणाम होणार नाही अशा सर्व वस्तू जहाजांवरुन उतरवून ठेवण्यात आल्या. अनेक तालीमींच्या अनुभवावरून तेलवाहू जहाजातून भर समुद्रात इतर जहाजात इंधन भरता येईल अशी उमेद वाटू लागली होती. तरीही सैनिकांच्या हालचालीस अत्यावश्यक असे सर्व मार्ग व विमानांचे उड्डाणमार्ग सोडून जहाजांच्या पृष्ठभागावरील सर्व जागा मोकळी करून तेथे तेलाची पिपे ठेवण्यात आली.

हल्लेखोर आरमाराच्या प्रयाणाची बातमी खुद्द जपानी जनतेपासून गुप्त ठेवणेही आवश्यक होते. आरमार उत्तरेकडे चालले आहे असा संशय सर्वसामान्य नागरिकांना येऊ नये यासाठी सैनिकांना उन्हाळी व हिवाळी असे दोन्ही प्रकारचे युनिफॉर्म देण्यात आले. सागरी विमानांची प्रचंड संख्येतील अनुपस्थितीही लोकांना जाणवली असती. त्यासाठी जमिनीवरील विमानदलाला विमानतळ व शहरांवरून जादा उड्डाणे योजिण्याची आज्ञा देण्यात आली. इतर किनाऱ्यालगतच्या वैमानिक तळावरील जास्तीत जास्त सैनिकांना रजेवर सोडण्यात आले. हे सैनिक निळे गणवेष घालून घोळक्याघोळक्यांनी शहरातून भटकू लागले. त्यामुळे बरेच वैमानिक शहरातून एकाएकी गायब झाल्याचे लोकांच्या ध्यानात आले नाही.

सबंध प्रवासात जहाजांनी बिनतारी संदेश पाठविण्याची यंत्रे चुकूनही वापरायची नव्हती. आरमार जसजसे दूर जाईल तसतशी जपानहून त्याला दिल्या जाणाऱ्या बिनतारी संदेशांची संख्या वाढत जाणार होती. या वाढीमुळे इतर राष्ट्रांना काही लष्करी हालचाली सुरू असल्याचा संशय आला असता. त्यासाठी आरमाराने कित्येक आठवडे पूर्वीपासून मोठ्या प्रमाणावर बनावट संदेशांची देवाण-घेवाण सुरू ठेवली. त्यामुळे हल्लेखोर जहाजांनी प्रवास सुरू केल्यावर बिनतारी संदेशात झालेल्या वाढीने इतर राष्ट्रांचे लक्ष वेधले नाही.

नोव्हेंबरच्या १७ तारखेस सेकी आखातात उभ्या असलेल्या 'अकागी'वर कामगिरीवर निघालेल्या दलातील मुख्य अधिकाऱ्यांना निरोप देण्याचा समारंभ झाला. त्यासाठी यामामोटो त्याच्या सहकाऱ्यांसह हजर होता. फुशिडाला त्याच्या चेहऱ्यावर कठोरता व खिन्नता या दोन्ही भावनांचे मिश्रण आढळले. यामामोटोला अमेरिकेबरोबरचे युद्ध जोखमीचे वाटत होते हेच त्याचे कारण असावे.

त्याचे भाषण नेहमीप्रमाणे ठराविक साच्याचे नव्हते. त्याने सांगितले, "अमेरिकनांना तुम्ही बेसावध पकडू शकाल असा विश्वास सर्वांना वाटतो खरा! तरीसुद्धा तुम्हास कडव्या प्रतिकाराला तोंड देण्याची तयारी ठेवावयास हवी. आपल्या आतापर्यंतच्या वैभवशाली इतिहासात आपण मंगोलियन, चिनी, रशियन अशा बलिष्ठ शत्रूंशी मुकाबला केला आहे. परंतु हा नवीन शत्रू फार वेगळा आहे. तो सामर्थ्यवान् आहे तसाच अतिशय श्रीमंतही आहे." या गोष्टींची जाणीव देण्याचा त्याचा हेतू स्पष्ट होता. तो आपल्या सैनिकांना अतिरेकी आत्मविश्वासापासून परावृत्त करू इच्छित होता.

नंतर वॉर्डरुममध्ये निरोपाची मेजवानी देण्यात आली. या प्रसंगी यामामोटोने मोहिमेला यश येईल अशी अपेक्षा व्यक्त केली. आतापर्यंतच्या प्रथेप्रमाणे हुकूम देणारे वरिष्ठ अधिकारी मोहिमेस यश लाभेल अशी आशा व्यक्त करीत. आज त्यापुढे जाऊन यामामोटोने त्याचा या दलावरील विश्वास व्यक्त केला. या विश्वासू शब्दांनी सर्वांची हृदये हेलावली. 'या युद्धात राजेसाहेबांना यश लाभो' असे शुभचिंतन करून सर्वांनी मद्यपान केले.

रात्र पडताच 'अकागी 'वरील दिवे बंद झाले. नांगर उचलून दोन विनाशिकांसह ते आखाताबाहेर निसटले! आसपासच्या बंदरातूनही अशाच गुप्ततेत आणखीकाही पथके बाहेर पडली. सहा विमानवाहू नौका, दोन युद्धनौका, एक हलके व दोन अवजड क्रूझर्स, तीन पाणबुड्या. नऊ विनाशिका व संथ गतीने प्रवास करणारी आठ तेलवाहू जहाजे असा एकूण एकतीस जहाजांचा प्रचंड जथा मायदेश सोडून कामगिरीवर निघाला.

या सर्वांचा रोख हिटोकपू आखाताकडे होता. जपानच्या उत्तरेकडील कुराईल्स या उष्ण समुद्र प्रवाहात अनेक लहान लहान बेटे आहेत. त्यातील 'इतोफुरू' या बेटांचा बराच मोठा भाग पाण्यात खचल्यामुळे 'हिटोकपू' आखात तयार झाले आहे. या भागात सतत वावरणाऱ्या नैसर्गिक धुक्यामुळे या बेटांना 'धुरकट बेटे' म्हटले जाते. टोकियोपासून ही बेटे उत्तरेस १००० मैलांवर आहेत. मोठी जहाजे या बाजूस सहसा फिरकत नाहीत. युरोपमधील मध्ययुगीन लुटारू (व्हायकिंग्ज) अशाच उजाड व खडकाळ बेटांच्या आश्रयाने दडून जहाजांवर दरोडे घालीत. हिटोकपू आखातातील या बेटावर मच्छिमार लोकांच्या दोन लहान खेड्यांशिवाय इतर कोठेही मानवी हालचालीचा मागमूस नव्हता. नगुमोचे आरमार तेथे पोचण्याअगोदरच तेथून इतर जगाशी चालणारे टेलिफोन, तार व पोस्टाचे दळणवळण अचानक तोडून टाकण्यात आले. आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठे विमानवाहू जहाजांचे दल हिटोकपू आखातात एकत्र झाले व पुढील हुकुमाची वाट पाहू लागले. काजळलेल्या आकाशातून अधूनमधून हिमवर्षाव होत होता. एकंदर वातावरण या दलाला लपून राहण्यास पोषक होते.

## रहस्याचा उलगडा !

२२ नोव्हेंबरच्या सकाळी नगुमोने त्याच्या मदतनीस अधिकाऱ्यांची बैठक बोलाविली. 'अकागी' वरील एका दालनात पर्ल हार्बर व ओहूची प्रमाणबद्ध प्रतिकृती व अमेरिकन नाविक तळाबद्दलची सर्व माहिती कडक पहाऱ्यात ठेवण्यात आली होती. सुझुकी नुकताच हवाईहून तेथील परिस्थितीचा अंदाज घेऊन आला होता. तो या अधिकाऱ्यांना आवश्यक ती जादा माहिती पुरवणार होता.

सुझुकीच्या तोंडून काही ताजी खबर मिळेल अशी सर्वांची अपेक्षा होती. परंतु त्याने पर्ल बंदराबद्दल सांगितलेली बरीचशी माहिती जुनीच होती. त्याने आठवडा-अखेर तळावर परतण्याची अमेरिकन आरमाराची प्रथा सांगितली, हवाईमधील वैमानिक तळांची बारीकसारीक माहिती दिली, अगदी विमानगृहांच्या छपरांची जाडीसुद्धा त्याने सांगितली ! बेटातील अमेरिकन विमानदलाच्या निरनिराळ्या विभागांच्या सामर्थ्याची कल्पना दिली. हवाईमध्ये ऐकूण ४५५ अमेरिकन विमाने असावीत असा अंदाज त्याने व्यक्त केला. पण त्यावेळी तेथे फक्त २३१ च विमाने होती.

सुझुकीचे कथन सुरू असता नगुमो अविचल होता. प्रत्येक मुद्याची त्याने मनात नोंद केली. सुझुकी थांबल्यावर मात्र त्याने शंकांचा भडिमार केला. मार्गावर पकडले जाण्याच्या शक्यतेचे काय ? शत्रू सावध असल्यास कसे ओळखावयाचे ? तसे असल्यास तो सूड घेतल्यावाचून राहील काय ? पर्ल हार्बरमध्ये अमेरिकन आरमार सापडलेच नाही तर ?

सुझुकीला या सर्वच शंकांचे निरसन करणे शक्य झाले नाही. टोकियोत सेनापती मंडळापुढे दिलेल्या माहितीचीच त्याने पुन्हा उजळणी केली.

अमेरिकन विमानवाहू नौकांबद्दलची तुटपुंजी माहिती ही सुझुकीच्या कथनातील सर्वात मोठी उणीव होती. ही महत्त्वाची शिकार आपल्याला हुलकावणी देते की काय अशी भीती जेंडा व फुशिडा यांना वाटत होती. त्यांनी सुझुकीस या नौकांबद्दल खोदून खोदून विचारले. पण तो विशेष माहिती देऊ शकला नाही.

दुसरे दिवशी सकाळी आरमारातील सर्वच्या सर्व अधिकारी 'अकागी' वर खास सभेसाठी जमले. त्यांच्या गोंगाटामुळे अकागीला मधमाशांच्या मोहोळाचे स्वरूप आले. हवाई हल्ल्यात भाग घेणाऱ्या वैमानिक पथकांचे नेते, हल्ल्याच्या प्रसंगी हालचालींवर नियंत्रण ठेवणारे सूत्रधार व सर्व जहाजांचे प्रमुख वॉर्डरुम-मध्ये एकत्र आले. सर्वांच्या मनात उत्सुकता शीगेला पोचलेली होती.

नगुमोने उठून एकदम घोषणा केली, 'आपल्या दलाला पर्ल बंदरावर चढाई करण्याची कामगिरी मिळाली आहे.' खळबळीची एक प्रचंड लाट सभेत उठली आणि हळूहळू कुजबुजीत विरली. आरमाराच्या युद्धतयारीचा हेतू सर्वांना प्रथमच

ठाऊक होत होता. काही मोजक्या व्यक्तींशिवाय बाकी सर्वजण त्याबद्दल अजूनपर्यंत अंधारातच होते. आपल्याला अजून युद्धतंत्राचे प्राथमिक शिक्षण दिले जात आहे अशी अनेक भाबड्या लोकांची समजूत होती !

नगुमोने पुढे सांगितले, 'हल्ल्याचा निर्णय अजून निश्चित झालेला नाही. जपानच्या अमेरिकेशी सुरू असलेल्या वाटाघाटी यशस्वी झाल्यास आपल्याला परत माघारी फिरावे लागेल. परंतु या वाटाघाटींना यश मिळण्याची शक्यता नाही. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास हल्ला निश्चितच केला जाईल. ही मोहीम अत्यंत जोखमीची आहे. जपानच्या युद्धयोजनात तिचे स्थान महत्त्वाचे आहे. ही यशस्वी व्हावी यासाठी प्रत्येकाने आपापले काम चोखपणे करावे.'

नगुमोच्या मदतनीसाने मोहिमेचा सर्वसाधारण आराखडा मांडला. आणखी एका अधिकाऱ्याने हवाईच्या धोक्याच्या प्रवासात प्रत्येक विभागाकडे सोपविण्यात आलेल्या कामाची माहिती दिली. ही सभा मुख्यतः वैमानिकांसाठी आयोजित केलेली होती. त्यामुळे जेंडा तासभर बोलत राहिला. संभाव्य प्रतिहल्ल्यास तोंड देण्यासाठी निश्चित केलेल्या कारवाईची त्याने कल्पना दिली. मुराटा व फुशिडा अधूनमधून काही मुद्यांचे स्पष्टीकरण करीत राहिले.

वैमानिक पथकांच्या अधिकाऱ्यांनी हल्ल्याच्या विविध पद्धतींचा अभ्यास केला. त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांसह प्रत्यक्ष मृत्युमुखात प्रवेश करायचा होता. त्यामुळे अगदी बारीकसारीक तपशीलाचाही विचार करावा लागला.

## सैन्य चालले पुढे !

अखेर नगुमोला अप्रिय वाटणारा संदेश येऊन थडकला ! यामामोटोने त्याला २६ नोव्हेंबर रोजी हवाईकडे कूच करण्याचा हुकूम दिला.

'पहिला हल्ला 'क्ष' या दिवशी पहाटे करावा. (हा दिवस मागाहून कळविण्यात येईल.). दरम्यान शत्रूशी चालू असलेल्या वाटाघाटी यशस्वी झाल्या तर आरमाराने ताबडतोब स्वदेशी परतावे.'

२६ नोव्हेंबरला भल्या पहाटे हा सुदैवी प्रवास सुरू झाला. धुक्यात गुरफटलेल्या प्रचंड जहाजांनी नांगर उचलून संथ वाटचालीस प्रारंभ केला.

प्रवासाच्या पहिल्या दिवशी काहीच नवल विशेष घडले नाही. हवामान अगदी अनुकूल राहिले. सौम्य वारा, ढगाळलेले आकाश आणि चार हातापलीकडील वस्तूही दिसणार नाही असे दाट धुके ! आरमाराचा प्रवास तेलवाहू जहाजांबरोबर धीम्या गतीने (ताशी १२–१३ नॉट) चालू राहिला.

आरमाराकडून कसलेही बिनतारी संदेश प्रक्षेपण होणे घातक ठरले असते. अशी चूक अनवधानानेही होऊ नये यासाठी अनेक बिनतारी यंत्रांची बटणे काढून टाकण्यात आली होती. ज्या यंत्रांबाबत असे करणे शक्य नव्हते त्यांना कुलुपे ठोकण्यात आली. जहाजांची आपापसातील संदेशांची देवाणघेवाण निशाणे व चमकत्या

दिव्यांनी चाले. रात्री सर्व जहाजावर मिट्ट काळोख राखण्याची दक्षता घेतली जाई खास तयार केलेल्या चमकत्या दिव्यांनी संदेश दिले जात. हे दिवे शक्य तितके झाकलेले असत. फक्त आवश्यक त्याच स्थानी ते प्रकाशाचा निमुळता झोत फेकत. तेलवाहू जहाजांच्या डेकवर नेहमी वावरणारा काळा धूर शक्य तितका कमी करण्याची तजवीज केली होती.

गुप्ततेसाठी इतकी सर्वांगीण उपाययोजना करूनही नगुमोच्या मनावर असलेले असह्य दडपण दूर होत नव्हते. अगदी मोजक्याच सैन्यप्रमुखांवर त्यांच्या कारकीर्दीत एवढी अफाट जबाबदारी पडली असेल. शिवाय विविध प्रकारच्या जहाजांचा समावेश असलेल्या नगुमोच्या नौदलाचे यश निव्वळ एकाच बाबीवर अवलंबून होते. ती म्हणजे अमेरिकन सैन्य पुरते गाफील अवस्थेत सापडणे ! ' पिशाच्चाप्रमाणे वावरणाऱ्या अमेरिकन पाणबुड्याकडून शिकार होण्याच्या भयामुळे नगुमोचे अंतःकरण धडधडत होते. वाटाघाटी सफल झाल्यामुळे हल्ला रद्द करण्याचा सेनापतीमंडळाकडून येणारा संदेश कदाचित् आपल्याला मिळणारच नाही या शंकेनेही तो धास्तावला होता.

जहाजावरील वैमानिक मात्र बेफिकीर होते. त्यांच्या मनोवृत्तीत काळजी व दडपणाचा लवलेशही आढळत नव्हता. रोज रोज धोक्याला तोंड देण्याची सवय असल्यामुळे त्यांची मनेच निर्भय बनली होती. स्वदेश व त्याचा अधिपती यावरील यांची निष्ठा अढळ होती. रात्री ते मोकळेपणाने 'सेक, गो, शोगी' वगैरे लोकप्रिय बैठे जपानी खेळ खेळत. दिवसा धुमधडाक्यात युद्धतंत्राचा सराव करीत. फोर्ड व ओहू बेटावरील प्रत्येक भौगोलिक व लष्करी तपशीलाचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला. अमेरिकन जहाजे एकाच दृष्टिक्षेपात नावासकट ओळखता यावीत यासाठी त्यांची मॉडेल्स त्यांनी अनेकदा हाताळली. 'सोर्यू'वरील वैमानिक अधिकारी कनाई याने जपानी आरमारातील उत्कृष्ट निशाणबाज हा किताब मिळविला होता. आपल्या कामगिरीस पूर्ण वेळ वाहून घेऊन त्याने सर्वांची वाहवा मिळविली. तो दिवसभर सर्व ठिकाणी उड्डाणाच्या पोशाखातच फिरे, दिवसातून अनेकवेळा विमानात चढून बाँबफेकीच्या तंत्राची पुनः पुन्हा उजळणी करी. त्याला त्याच्या चिकाटीचे फळ मिळाल्याशिवाय राहिले नाही. युद्धाचे वेळी 'अरिझोना'वर अचूक मारा केल्याचे श्रेय त्याला मिळाले.

सर्वसामान्य जगाला ठाऊकही नसलेले 'जपानचे पहिले सागरी विमानदळ' उत्तरेकडून त्याच्या भक्ष्याकडे गुप्तपणे, दबकत, सरपटत होते. प्रशांत महासागराकडे जगाचे लक्ष फारसे नव्हतेच. दक्षिण प्रशांत महासागरात जपानी नौदलाच्या उघड हालचाली चालू होत्या. अमेरिकन जनता तिकडे थोड्याफार उत्सुकतेने पहात होती. याच सुमारास इंडोचायनात जपान्यांची जमवाजमव सुरू झाल्यामुळे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांनी जपानी राजदूताची भेट घेतली. जपान्यांच्या या हालचालींचा रोख थायलंडविरुद्ध असावा असा अंदाज अमेरिकन वृत्तपत्तांनी व्यक्त केला.

'तादुता मारु' या जपानी जहाजाने ठरल्याप्रमाणे २ डिसेंबरला याकोहामा सोडून हवाईकडे प्रयाण केले. ही-अमेरिकनांच्या डोळ्यात धूळफेक ठरली! अमेरिकेस तीन व्यापारी जहाजे पाठविण्याची सवलत जपानने मिळविली होती. त्यातील हे तिसरे जहाज! जपानमधील अमेरिकनांना अमेरिकेस पोचवून त्याच्या बदल्यात तेथील जपान्यांना मायदेशी आणण्याचे काम हे जहाज करणार होते. त्याच्या या कामगिरीला जपान्यांनी मुद्दामच खूप प्रसिद्धी दिली. हे जहाज १४ डिसेंबरला अमेरिकेस पोचणार होते. सहाजिकच ३ डिसेंबरला न्यूयार्क टाईम्सने त्याच्या प्रयाणाचा जो अर्थ लावला त्यात म्हटले होते की, पुढील पंधरा-वीस दिवसात तरी जपान अमेरिकेविरुद्ध गडबड करण्याची शक्यता नाही.

७ डिसेंबरला जपान्यांची लबाडी उघडकीस आली. त्यादिवशी 'तादुता मारु' दिशा बदलून जपानकडे परतले!

## हवाईची शेवटची साखरझोप

प्रवासाच्या सातव्या दिवशी नगुमोला जपानमधून रेडिओवरून एक संदेश मिळाला. या संदेशामुळें नगुमोच्या त्रस्त मनाला थोडासा दिलासा मिळाला. संदेशात '७ डिसेंबर १९४१ रोजी नीटाक पर्वतावर चढाई करा' अशी सूचना होती. गुप्त भाषेतील या संदेशाचा अर्थ होता—वाटाघाटी निष्फळ ठरल्या असून युद्ध अटळ आहे. त्या दिवशी आंतरराष्ट्रीय वार रेषेच्या पूर्वेस १ डिसेंबर ही शेवटची तारीख होती. जपानमध्ये ती २ डिसेंबर होती. अमेरिकनांची दिशाभूल करणारा 'तादुता मारु'चा फसवा प्रवास याच दिवशी चालू झाला.

उत्तर प्रशांत महासागरातील 'मिडवे' या अमेरिकन नाविक तळाच्या कक्षेतून आरमाराचा प्रवास चालू होता. एखादे चुकार अमेरिकन जहाज अगर विमान भेटण्याची शक्यता होती. त्यामुळे सर्वजण अस्वस्थ झाले. परंतु 'मिडवे'च्या नजरेतून आरमार अखेर सहीसलामत पुढे निसटले. लपतछपत हवाईनजीक पोचून त्याने अर्धे यश मिळविले होते. आता शत्रूशी प्रत्यक्ष दोन हात करण्यासाठी सैनिकांचे बाहू स्फुरू लागले. दरम्यान वॉशिंग्टनमध्ये शांततेची बोलणी पुढे चालू ठेवण्याची आज्ञा जपानी वकील नोमुरा व खास दूत कुरुसु यांना मिळाली. अमेरिकन जनतेचे लक्ष या वाटाघाटीत गुंतविण्यासाठी त्यांना ठळक प्रसिद्धी मिळावी याची व्यवस्था जपानने केली होती.

६ डिसेंबरला आरमारातील सर्व जहाजांच्या टाक्या तेलाने पुरेपूर भरण्यात आल्या. तीन तेलवाहू जहाजे यापूर्वीच जपानकडे परतली होती. आता बाकीची सर्व तेलवाहू जहाजे एका नियोजित संकेतस्थानी रवाना झाली. दिवस कलू लागल्यावर सर्व सैनिकांना डेकवर बोलाविले गेले. तेथे त्यांना राजेसाहेबांचा युद्धाचा हुकूम वाचून दाखविण्यात आला. त्यानंतर यामामोटोने पाठविलेला खास संदेशही वाचला गेला. 'या एकाच युद्धावर आपल्या मातृभूचे भवितव्य अवलंबून आहे. युद्ध यशस्वी व्हावे यासाठी प्रत्येकाने आपले कर्तव्य चोखपणे पार पाडावे.'

सर्व जहाजांनी दक्षिणेकडे तोंडे वळविली. हल्लेखोर विमाने समुद्रातील ज्या नियोजित स्थानावरून उड्डाण करणार होती त्याच्या दिशेने शेवटचा वेगवान प्रवास सुरू झाला.

हे आक्रमक दल आता त्याच्या भक्ष्यापासून फक्त ५०० मैलांच्या कक्षेत पोचले होते. शत्रूच्या किल्ल्याच्या दारातच अचानक पकडले गेल्यास त्याचा सर्वनाश अटळ होता. पुढील काही तास वातावरण तंग राहिले. परंतु या साहसी वीरांवर दैवाचा पूर्ण वरदहस्त होता. एकही अमेरिकन गस्ती विमान त्याच्या जवळपास फिरकले नाही. अंधार पडू लागला तेव्हा सर्वांना हायसे वाटले. उरलेला सर्व काळ शस्त्रे परजून युद्धास सिद्ध झालेले जपानी आरमार मिट्ट काळोखाच्या बुरख्यात सुरक्षित राहणार होते.

बंदरात नांगरून ठेवलेल्या जहाजांवर शत्रूच्या विमानांना बाँबहल्ला करता येऊ नये यासाठी त्यांवर उंच उंच बलून्स उभारण्यात येतात. अशा प्रकारची बलून्स अमेरिकन आरमाराने पर्ल बंदरात आणून ठेवलेली होती. त्याने जहाजाभोवती टारपेडोनिरोधक लोखंडी जाळी उभारलेली असण्याचीही शक्यता होती. या जाळ्यांचा भेद करणे जपान्यांना अशक्य वाटत होते. अखेर टोकियोहून मध्यरात्रीपूर्वी मिळालेल्या बातमीमुळे जेंडा व फुशिडाची चिंता दूर झाली. अमेरिकन जहाजांवर बाँबहल्ला विरोधक बलून्स उभारलेली नाहीत असे बातमीत म्हटले होते. जहाजांसभोवती टारपेडोनिरोधक लोखंडी जाळी टाकल्याचेही चिन्ह दिसत नव्हते. या बातमीमुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरले.

हल्ल्यापूर्वी काही तास टोकियोहून आणखी एक अखेरचा संदेश मिळाला.' पर्ल बंदरात अमेरिकेचे एकही विमानवाहू जहाज नाही. तिथे फक्त ९ युद्धनौका ७ क्रूझर्स आणि १९ विनाशिका आहेत. 'संदेशात ओहूच्या परिसरातील हवामानाची वार्ताही दिली होती. पण ती अनावश्यक होती. खुद्द अमेरिकन रेडिओवरून तासातासाला ही माहिती मिळत होती.

जपानमधील सर्व आरमारी अधिकाऱ्यांचे डोळे आता पर्ल हार्बरवर खिळले होते.

यामामोटोचा मदतनीस त्यादिवशी त्याच्या डायरीत विश्वासपूर्वक लिहित होता, ' हवाई ! शेवटची रात्र खुशाल साखरझोप घेत रहा. उद्याच्या रात्री तुला झोपणे अशक्य होणार आहे. '' त्यानंतर या मोहिमेबद्दल स्वतःच्या दबलेल्या भावना व्यक्त करताना तो लिहितो, ' एका चिमुकल्या राष्ट्राच्या भवितव्यासाठी केवढा भयंकर जुगार खेळला जात आहे !'

७ डिसेंबर रोजी पहाटे नगुमोला त्याच्या जबाबदारीतून सुटका मिळाली. त्याने जेंडाला सांगितले, ' मी हे आरमार हल्ल्याच्या स्थळापर्यंत सुरक्षितपणे आणले आहे. यापुढील कामगिरी मी तुझ्यावर सोपवितो. ' या शब्दाबरोबर नौदलाच्या इतिहासातील एक पर्व संपले. सागरी विमानसामर्थ्याच्या नवयुगास प्रारंभ झाला.

( क्रमशः )

(आधारित)

## निवडणुका : प्राथमिक चित्र

पृष्ठ २१ वरून

जालना मतदारसंघात कम्युनिस्टांना जनसंघापेक्षा अधिक मते मिळाली. रिपब्लिकन पक्ष विरोधी आघाडीत येत असेल तर चिमूरची जागा त्या पक्षास दिली पाहिजे. मुंबई वायव्य, भिवंडी, जळगाव, नागपूर, नांदेड व सांगली या मतदारसंघात जनसघास गेल्यावेळी चौथ्या क्रमांकांची मते मिळाली. मुंबई वायव्य मतदारसंघात समिती पुरस्कृत गोखले व स्वतंत्र पक्षाचे मधु मेहता यांनी अधिक मते मिळविली. लोकसभा निवडणुकीत यावेळी समिती उतरलेली नाही पण समिती बाजूला ठेवली तरी स्वतंत्र पक्ष उमेदवाराचा या जागेवर जनसंघापेक्षा अधिक हक्क आहे. भिवंडीत शे. का. पक्ष व प्रजासमाजवादी पक्षास जनसंघापेक्षा अधिक मते मिळाळी. प्रजासमाजवादी पक्षाने इंदिरा–काँग्रेसशी समझोत्याचे धोरण स्वीकारल्याने इंदिरा काँग्रेसविरोधी पक्षांचा त्यास पाठिंबा मिळणे शक्य नाही तेव्हा ही जागा शे. का. पक्षास मिळायला हवी. जळगावमध्ये प्रजासमाजवादी व संयुक्त समाजवादी पक्षाने जनसंघापेक्षा अधिक मते मिळविली होती तेव्हा इंदिरा–काँग्रेसविरोधी पक्षांचे आघाडीने ती जागा संयुक्त समाजवादी पक्षास देणे योग्य ठरेल. नागपूरला कम्युनिस्ट वर्धन व विदर्भवादी अणे यांनी गेल्यावेळी जनसंघापेक्षा अधिक मते मिळविली होती. या मतदारसंघात जनसंघाला यश मिळण्याची शक्यता कमी आहे. जेथे यशाचा संभव नाही अशा जागा लढविण्यात शक्ती खर्च करण्यापेक्षा त्या न लढविणेच चांगले. येथील कार्यकर्त्यांचा उपयोग इतरत्र प्रचारासाठी करून घेणे अधिक फायद्याचे ठरेल. नांदेड व सांगलीच्या जागेसंबंधी वर मी लिहिलेच आहे.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेता जनसंघाने जाहीर केलेल्या सोळा जागांपैकी नंदुरबार, बुलढाणा व रत्नागिरी या तीनच मतदारसंघात जनसंघाचे वजन आहे व विजय मिळाला तर तो या तीन मतदारसंघात मिळण्याची शक्यताच अधिक आहे. पण या जागा जिंकणेही सोपे नाही. नंदुरबार हा आदिवासी मतदारसंघ गेल्यावेळी काँग्रेस व जनसंघ यांच्यातील सरळ सामन्यात काँग्रेसने तेथे ४०,००० म्हणजे १५ टक्के अधिक मते मिळविली. बुलढाणा मतदारसंघात १९६७ साली काँग्रेसला ५७ टक्के व जनसंघास २३·३८ टक्के मते मिळाली होती. काँग्रेस उमेदवार राणे पक्षातील फुटीनंतर निजलिंगप्पा–काँग्रेसला मिळाले. त्यांच्या निधनाने झालेल्या पोट निवडणुकीत एप्रिल १९७० मध्ये निजलिंगप्पा–काँग्रेसच्या उमेदवाराचा १,७२,४५६ एवढ्या प्रचंड बहुमताने पराभव करून इंदिरा–काँग्रेसचे प्रा. या. शि. महाजन निवडून आले. इतर दोन अपक्ष उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली. जनसंघाने ही पोटनिवडणूक लढविली नव्हती. पण निजलिंगप्पा-काँग्रेसचे निकम यांना यावेळी पडलेल्या मतांपेक्षा जनसंघाने १९६७ च्या निवडणुकीत अधिक मते मिळविली होती·

पृष्ठ ५६ वर

ही सेवक मंडळी विद्यार्थ्यांवर तुटून पडतात. परंतु त्यांचा हेतू स्वतःला मोठेपणा मिळवणे हाच असतो. अशाच एक प्रख्यात समाजसेविका पाश्चात्य देशांचा दौरा करून आल्या. पाश्चात्य देशातले सर्व चांगले, आपला देश मात्र भिकाऱ्यांचा हे गृहीत धरूनच वागणाऱ्यांना असा प्रसंग म्हणजे सुसंधी. पश्चिमेच्या प्रभावाने भारलेल्या या बाईंनी आल्याबरोबर एक लेख लिहिला. (की भाषण ठोकले !) यांचा मुद्दा असा...' तिकडे विद्यार्थी शिस्तप्रिय आहेत, नोकऱ्या करून ते शिक्षण घेतात. नाहीतर आपले पहा. काही काम नको, आई-बापांच्या जीवावर मजा करायला हवी '...इत्यादी. या सेविकाबाईंना धडा शिकवावा म्हणून काही विद्यार्थी त्यांच्या घरी गेले. गुबगुबीत सोफ्यावर बसल्यावर थोड्या वेळानी त्या आल्या.

' नमस्कार. आपला लेख वाचला. फार छान झाला आहे. आपला मुद्दा पटला. फार योग्य आहे. आपल्या विद्यार्थ्यांनी तिकडच्या विद्यार्थ्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवला पाहिजे '...

' होना किती कष्टाळू आणि समजुतदार आहेत तिकडचे विद्यार्थी '...बाईंचा अहंकार सुखावला.

' आपल्या लेखामुळे खूप विद्यार्थ्यांना आपल्या आळशीपणाची लाज वाटायला लागली आहे '

' एक जरी विद्यार्थी सुधारला तरी माझ्या लेखाचा योग्य परिणाम झाला असं समजेन मी '

' असे एक नाही, शंभर विद्यार्थी सुधारले आहेत. आता सर्वजण बाहेर उभे आहेत. द्या त्यांना नोकऱ्या. नोकरी करून शिकायची त्यांची तयारी आहे '

' मी कुठल्या नोकऱ्या देणार ? आज काय परिस्थिती आहे ? बेकारी किती वाढली आहे '...बाई गोंधळून गेल्या होत्या.

असले हे भोवतालच्या जगाची जाणीव नसताना बडबड करणारे समाज सेवक, स्वार्थी आणि लुच्चे पुढारी. यांनी विद्यार्थ्यांना फक्त उपदेश करावा आणि यांना आम्ही मोठेपणा द्यावा अशी परिस्थिती आहे. या मंडळींच्या तारुण्यात गांधी, नेहरू, टिळक, सावरकर असे आदर्श होते. तरी अशी परिस्थिती आली आहे. आमच्यापुढे मात्र सर्वत्र हरामखोर, भ्रष्ट, नीच लोक पसरले असताना आम्ही असंतुष्ट का राहू नये ? दुर्दैवाने आम्ही शिकलेले आहोत त्यामुळे ' कर्ताकरविता परमेश्वर ' देवाची इच्छा असे निष्कर्ष काढून गप्प बसण्याची आमची तयारी नाही आणि या नालायकांना सत्ता स्थानावर येऊ देण्याची देखील इच्छा नाही.

## आमचे विद्यापीठ आमचे प्राध्यापक

आमच्यापैकी एकहीजण ज्ञानार्थी नाही. सर्वजण पोटार्थी आहेत हे स्पष्ट आहे. पदवीच्या आधारावर पोटाची खळगी भरू पहाणारे आहोत तरीही सर्वथैव निरुपयोगी ज्ञान देऊन हजारो पदवीधर निर्माण करण्याचा कारखाना चालू आहे. विद्यापीठातील व्यवसाय विनिमय केंद्रात...' Stenographer, only person in demand' अशी भली मोठी पाटी आहे. इतका भीषण विनोद कधीही झाला नसेल. असे असूनदेखील तेच विद्यापीठ...' Graduate the only person said to be useless'...निर्माण करीत आहे. विद्यापीठाच्या कारभारात किती भ्रष्टाचार आणि अनागोंदी आहे हे एका प्रख्यात वृत्तपत्राने जाहीर केले होतेच. परंतु त्याच्यापलीकडे देखील अनेक गोंधळ असतात.

परीक्षातील गोंधळ पाहिले तर धक्का बसेल अशी प्रकरणे आहेत. प्रश्नपत्रिका जशीच्या तशी लिहिणाऱ्याला आठ गुण, अडीच प्रश्न लिहिणाऱ्याला ३८ गुण, अडीच प्रश्न म्हणजे चाळीस पैकी अडतीस गुण. ते देखील अर्थशास्त्रामध्ये. परीक्षेला न बसता सत्तावीस गुण. असे चमत्कार करणारे विद्यापीठ मेहेनती विद्यार्थ्यांना घाणेरडे गुण देऊन त्यांच्या आयुष्याचे अकल्याण करते. रक्ताचे पाणी करून देखील थर्डक्लास मिळणारे अनेक विद्यार्थी आहेत. पूर्वी बंगाली विद्यार्थ्यांचा राग येत असे पण आज मात्र त्यांचेच बरोबर वाटायला लागले आहे.

आम्हाला दिले जाणारे ज्ञान निरुपयोगी आणि कालबाह्य आहे हे इतक्या जणांनी लिहिले आहे, की पुन्हा मी लिहिण्याची गरजच नाही. तीस वर्षांपूर्वी काढलेल्या नोटस्वरून अजून शिकवतात. अशा लोकांबद्दल आम्ही आदर का ठेवावा? माझी खात्री आहे की हर्बट मार्क्यूज याचे नाव देखील माहिती नसणारे अर्थशास्त्राचे व समाजशास्त्राचे प्राध्यापक ९५% सुद्धा सापडतील. 'गोखले इन्स्टीटयूट मध्ये शिपाई म्हणूनसुद्धा जाण्याची ज्यांची योग्यता नाही ते लोक तुम्हाला शिकवायला आहेत'...असे एक अर्थशास्त्रज्ञ म्हणाले होते. विद्यापीठाच्या क्षेत्राबाहेर यांची इतकी किंमत ठेवली जाते. एका सुविख्यात व्यथचिकित्सकांनी सुचवल्याप्रमाणे जर प्राध्यापक मंडळींचे 'जॉब व्हॅल्युएशन' केले तर ७०% लोक रस्त्यावर येतील आणि उरलेल्यातल्या बहुतेकांना ५५–३–८५ EB ची ग्रेड मिळेल...

## आमचा समाज

आपला समाज अत्यंत दांभिक आणि जुन्या खोटया प्रतिष्ठेच्या कल्पनांनी भारला गेलेला आहे. आम्हाला या समाजाबद्दल काडीमात्रही प्रेम वाटत नाही. समाजाच्या दृष्टीने विद्यार्थी बेशिस्त, पोषाखी बनत आहे. त्याला गुरुजनांबद्दल, मोठ्या माणसांबरोबर मुळीच आदर नाही. आम्ही असे का वागतो याचा कोणीही विचार करत नाही. फॅशनेबल कपडे घालणे, सिनेमा नटांसारखे कपडे घालणे याला

नावे ठेवण्यापूर्वी त्यांनी स्वतःचे तारुण्य आठवावे. गंधर्व कॅपची फॅशन करणाऱ्यांनी 'गुरू शर्ट'ला नावे ठेवणे कितपत योग्य आहे? आजच्या मुली नटीचे अनुकरण करतात पण पूर्वीच्या काळात नटाचें अनुकरण करीत. अशा या ढोंगी समाजानेच आम्हाला बिघडवलें आहे.

प्रामाणिकपणे वागणे आज आम्हाला शक्य नाही. समाज तसे वागू देत नाही. वशिल्याशिवाय नोकरी मिळत नाही. लाचारीशिवाय टिकत नाही. खोटेपणाशिवाय धंदा चालत नाही. आणि याला कारण या भोंदू समाजाने निर्माण केलेली नालायकांची चलती. समाज आम्हाला वाईट वागणे भाग पाडतो. समजा आमच्यापैकी एखादा जर कॉलेजात डिपार्टमेंटल सेक्रेटरी असला तर त्याला तिरस्करणीय वर्तणूक देतात. तो बिचारा स्वतःचे अनेक तास मोडून फुकट काम करतो आणि तरीही तो पसे खात असेल असा अविश्वास दाखवला जातो. कॉलेजात जाणाऱ्या प्रत्येकाची लफडी आहेत असे गृहीत धरले जाते. मग आम्ही मुद्दाम चिडून तसे वागलो तर तो दोष आमचा ठरणार नाही. आम्हाला या समाजाबद्दल आणि त्या समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिधींबद्दल मुळीच आदर नाही, निवडणुकांबद्दल कुतुहल नाही. साऱ्या निवडणुका, लोक आणि लोकसभा देखील खड्ड्यात जाऊ देत. आमचे प्रश्न सोडवण्याची ज्यांची धमक नाही त्यांच्याविषयी आम्ही कुतुहल का बाळगावे?

## वशिलेबाजी, भ्रष्टाचार

नालायक पुढारी, भ्रष्ट विद्यापीठे आणि भोंदू समाज यांच्या कुसंस्कारांमुळे किडलेले आम्ही फडतूस लोक आहोत. आमच्यात काहीही कर्तृत्व नाही. कसलं ही धमक नाही. कुठेतरी खर्डेघाशी करण्याचीच आमची लायकी आहे. त्या ठिकाणी सुद्धा आज भ्रष्टाचार चालू आहे. बँकेतल्या कारकुनांच्या जागांसाठी खासदार आणि कंपन्यांचे संचालक असे वशिले आवश्यक ठरतात. सहाशे रुपयात बँकेतील कारकुनाची जागा हा आजचा भाव आहे. पोलीस खात्यात किमान उपमंत्र्याचा वशिला पाहिजे अशी वदंता आहे. लष्करात जायचे असेल तर तुमचा भाऊ, वडील यांच्यापैकी कोणीतरी लष्करात असणे जरूर आहे.

या वशिल्याच्या जगात आमचा निभाव लागत नाही. अभ्यासात मेहनत करून उपयोग होणार नाही याचा कटु अनुभव घेऊन बसलो आहे. आज ज्ञानाला किंमत नाही. कुठेही श्रद्धा ठेवता येईल अशी परिस्थिती नाही. आज आम्ही अतिरेकवादी झालो नाही, पण उद्या होणार नाही असे सांगता येत नाही. आज आम्हाला कोणाचाही वाद नाही, विचारसरणी नाही. फक्त एकच प्रश्न आहे तो म्हणजे भूक. आज उपाशीपोटी आम्ही काहीही विचार करू शकत नाही. जो आम्हाला पोटाला देईल त्याच्यामागे आम्ही जाऊ. आम्हाला अमेरिकावादी भांडवलशाही चालेल. राष्ट्रवादी जनसंघ चालेल, रशियावादी साम्यवादी चालेल. कोणीही

चालेल. आज आमच्या पुढचे प्रश्न सोडवणारा कोणीही चालेल. भरल्या पोटानी तत्त्वज्ञान सांगणारे नकोत. जोपर्यंत आमचे प्रश्न सुटत नाहीत तोपर्यंत आम्हाला कोणीच नको, तुमच्या निवडणुका नकोत, पुढारी नकोत, वाद नकोत. **Let it** go to hell.

## माझ्या जाहीरनाम्याजवळ येणारे पक्ष.....

राजेंद्र पटवर्धन

हे आपले 'पहिले पाऊल' खरोखरच अपूर्व आहे. एक मतदानाचा हक्क नसलेला कॉलेज विद्यार्थी – १९ वर्षांचा – या नात्याने 'माझा जाहीरनामा' मांडीत आहे. लोकशाहीमध्ये राजकारणी जेवढा महत्त्वाचा आहे, तेवढाच नागरिकही आहे. हा नागरिक जागृत (Conscious) असेल, तरच लोकशाही सुरक्षित आहे. लोकांना जागृत करण्याच्या दृष्टीने आपले आवाहन अपूर्व आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळून २३ वर्षे झाली. औद्योगिक उत्पादन आणि धान्याचे उत्पादन दुप्पट झाले हे सर्व खरे, परंतु लोकसंख्येची वाढ एवढी अफाट झाली आहे आणि होते आहे की, १९५३ मध्ये भारतीय माणसाचे जे खाद्यप्रमाण होते (Food intake) त्यात मात्र काहीही वाढ झालेली नाही. लोकसंख्या अशीच वाढत राहिली, तर आणखी ४० वर्षांत ती दुप्पट (१ अब्ज २० कोटी) होईल. एवढेच नव्हे, तर आणखी ५० वर्षांत चालण्यासही जागा उरणार नाही. हे एवढे लिहिण्याचे कारण कोणताही वाद – समाजवाद, भांडवलवाद इत्यादी – आणला, तरी लोकांना जगणे लोकसंख्या विस्फोटामुळे अशक्य होणार आहे. आज दुर्दैवाने हा राष्ट्रीय प्रश्न म्हणून कोणताही पक्ष याकडे विचार करीत नाही. एक नागरिक म्हणून कोणत्याही पक्षाकडून पहिली गोष्ट मी अशी बघेन की, लोकसंख्याप्रश्नाबद्दल त्याला किती जाणीव आहे. १९८० पर्यंत आमचा पक्ष, जन्मप्रमाण दर हजारी २५ पर्यंत आणील, असा जो पक्ष म्हणेल त्याला जनकल्याणाची – जे सर्व 'वादां'चे ध्येय आहे, असावे – जाणीव आहे असे मी म्हणेन.

'मनुष्य' ही एकच जात मी मानतो. घटनेप्रमाणे All men are born epual असे मी मानतो. एकीकडे समानतेचा पुरस्कार करावयाचा व दुसरीकडे मुस्लीम मते मिळवण्यासाठी त्यांच्यासाठी दुसरा धार्मिक कायदा ठेवावयाचा हा घटनेचा अपमान बास झाला. पाकिस्ताननेही द्विभार्याप्रतिबंधक कायदा केला. माझी प्रत्येक पक्षाकडून ही अपेक्षा राहील की, तो पक्ष सर्वांसाठी समान नागरी

कायद्याचा (Uniform Civil Code) पुरस्कार करील.

हल्ली आर्थिक मक्तेदारी आणि केंद्रीकरण (Monopolies आणि Concentration of wealth) यासंबंधी खूपच चर्चा केली जाते. यामध्ये एक गोष्ट मला म्हणावीशी वाटते की, आर्थिक केंद्रीकरणाने औद्योगिक उत्पादन वाढणार असेल, आणि देशाच्या राजकारणावर त्याचे विपरीत परिणाम होणार नसतील, तर ते होऊ दिले तर काय हरकत आहे? आज तरुण तुर्क भांडवलदारांच्यावर वाटेलं तसे हल्ले करू शकतात, Monopolies and Restrictive Trade practices Act इतक्या सहजासहजी मंजूर होऊ शकतो, याचा अर्थच हा की, लोकसभेतील मतदानावर आर्थिक केंद्रीकरणाचा काहीही विपरीत परिणाम झालेला नाही. याउलट सार्वजनिक क्षेत्रातील कारखान्यांचे तोटे बघितले की असे वाटते, 'हेच का आपले ध्येय?' चळवळ आणि दंगेधोपे यांच्या धमकीला भिऊन, आर्थिक आणि तांत्रिक दृष्ट्या योग्य नसताही, करदात्यांचे १०० कोटी रुपये तेल कारखान्यात आसामात गुंतवले जातात, याला काय म्हणावयाचे? यापेक्षा खाजगी क्षेत्रास प्राधान्य देणे मी केव्हाही पसंत करीन. आज देशाची गरज आहे उत्पादनवाढीची. यासाठी आर्थिक मक्तेदारी, लायसेन्सिंग आणि घोषणा यांच्यापेक्षा जो पक्ष लायसेन्सिंग काढून टाकील, त्याला माझा पाठिंबा राहील. यामुळे उत्पादन नक्कीच वाढेल.

संरक्षणाकडे बघताना सामाजिक हिताच्या दृष्टिकोनातून बघितले, तर अणुबाँब बनविणे हा मूर्खपणा होईल. चीनने १९६२ नंतर अणुबाँबची भीती घालून काही भारताकडून मिळविले आहे (Blackmailing केले आहे) असे मला वाटत नाही. पाकिस्तानही अणुबाँब बनविणे अशक्य आहे, कारण पाकिस्तान तेवढा अमेरिकेच्या कह्यात आहे. या परिस्थितीत आपण स्वतः पुढे होऊन अणुबाँब करणे हे आगीत तेल ओतणे आहे. आज आंतरराष्ट्रीय परिस्थिती अशी नाही, की दगड उचलून फेकावा त्याप्रमाणे अणुबाँब टाकावा. लाल चीनला संयुक्त राष्ट्रसंघात प्रवेश मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. या प्रसंगी अण्वस्त्र प्रसारबंदीकरारावर पाकिस्तान आणि चीन यांना सही करावयास लावणे – म्हणजे प्रयत्न करणे, हे योग्य धोरण होय. अणुशक्तीचा वापर शांततामय कारणासाठी जास्तीत जास्त करावा असा पुरस्कार पक्षांनी करावा.

माझी एक अपेक्षा – सर्वच पक्षांकडून ही असणार की, ते शेतीच्या उत्पन्नावर आयकर बसवतील. एकाद्या प्राध्यापकांनी ५००० रुपये वर्षास मिळविले, तर त्यांना प्राप्तीकर आणि ३०,००० रुपये एकाद्या शेतकऱ्याने मिळविले तर प्राप्तिकर नाही! शेतकऱ्याबद्दल दयाबुद्धी असावी, पण ही दयाबुद्धी नसून favouritism होय. ही 'समता!'

परराष्ट्रधोरणात आज भारताचे धोरण हे त्या प्रश्नावर रशियाचे धोरण काय

आहे त्यावर अवलंबून असते. या इतिहासात जाण्याचे कारण नाही. उदाहरणादाखल इस्रेलचे उदाहरण घेऊ. भारत आणि इस्रेल दोनही शांतताप्रिय लोकशाही राष्ट्रे – दोघांचे शत्रू धार्मिक अतिरेकी, अविवेकी हुकूमशाही राजवटी. तरीही भारत इस्रेलचे शत्रुत्व करतो. हा भारताचा idealism ! कोणत्याही पक्षाकडून या धोरणाची सुधारणा झालीच पाहिजे.

आज मुख्य प्रश्नांकडे दुर्लक्ष करून लोकांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी 'जातीयवाद' या विषयाला उकरून काढले जात आहे. पंतप्रधानांच्या तोंडी रोज जातीयवादाचा भस्मासुर पण एका विश्वविद्यालयाच्या कुलगुरूंचा कलकत्त्यात खून होतो त्याबद्दल शब्दही नाही ! इस्रेलचे परराष्ट्रमंत्री आबा एबान यांनी म्हटले आहे–'Men and nations do behave wisely – once all other alternatives have been exhausted.' आज बंगालमध्ये हीच वृत्ती दिसते. शहाणपणाचा मार्ग एकच – जो अजून सुचला नाही – तो म्हणजे लष्करी कायदा पुकारणे. ही अपेक्षा कोणत्याही पक्षाकडून असणारच. कोणीही कोणाला मारावे – आमचे जीवित इतके स्वस्त खासच नाही !

शांती (Peace) ही काही स्थितिजन्य (Static) गोष्ट नव्हे, ती गतिमान (Dynamic) गोष्ट होय. याचा अर्थ एकादे राष्ट्र शांती उपभोगत असते, तेव्हा त्या राष्ट्रातील लोक कार्यमग्न असतात. अर्थातच जेथे प्रचंड बेकारी आहे, ते राष्ट्र शांतिमय नव्हेच. भारतातील बेकारी नष्ट करा हे सर्वच सांगतात. त्यासाठी Specific कार्यक्रम जो पक्ष देईल तोच खरा. उदाहरणार्थ, पर्यटन. आंतरराष्ट्रीय-पर्यटनावर युगोस्लाव्हियाने २५% नफा मिळविला गेल्या वर्षी. एकट्या बँकॉक-मध्ये परदेशी प्रवाश्यांसाठी सबंध भारतात आहेत त्यापेक्षा जास्त खोल्या आहेत. म्हणजे येथे हॉटेल्सची गरज आहे, नफा भरपूर मिळणार आहे, नोकऱ्या खूप मिळणार आहेत, पण केव्हा ? जेव्हा Communalism सारखा पोकळ शब्दच्छल संपून देशाच्या प्रगतीकडे लक्ष वळेल तेव्हा. पर्यटनाचे एक उदाहरण झाले. स्मग-लिंगवर नियंत्रण, मच्छिमारी असे अनेक विशिष्ट विषय आहेत. राजकीय पक्षां-कडून Dynamism (गतिमानता) पाहिजे, विशिष्ट कार्यक्रम पाहिजे. समाजवाद, जातीयवाद यावर पोकळ चर्चा नको, मोठे प्रश्न डावलून छोट्यांना महत्त्व देणे धूळफेकच होय. संस्थानिकांचे ४ कोटींचे तनखे बंद करण्यासाठी हा गहजब, तिकडे रेल्वेला ७० कोटी तोटा !

शेवटी, भारत हा स्वातंत्र्यप्रिय देश आहे. येथे संभाषण, लेखन, विचार यांचे स्वातंत्र्य आहे. हे अबाधित राखणे ही फार मोठी कामगिरी आहे. Free Press नसेल, तर त्या लोकशाहीला काही अर्थ नाही. आज इंद्रकुमार गुजराल आणि के. के. शहा यांसारखे पुढारी सरकारी दडपण आणून वृत्तपत्रांस जेरीस आणत आहेत. हे गुजरातमधील 'जनशक्ती' या वर्तमानपत्राच्या संपादकांच्या राजीनाम्यावरून

आणि त्यांनी लिहिलेल्या संपादकीयावरून सिद्ध झाले आहे. हे स्वातंत्र्य आम्ही अबाधित ठेवू हे आश्वासन प्रत्येक पक्षाकडून आवश्यक आहे.

जनसंघाची अणुबाँबबद्दलची भूमिका अव्यवहार्य असली, तरी मी वर उल्लेखिलेल्या जाहीरनाम्याजवळ येणारे पक्ष संघटना काँग्रेस, जनसंघ आणि स्वतंत्र हेच होत. ग

## नवकाँग्रेस सोडून इतर कोठल्याही पण. . . . .

वामन शोणॉय

' निवडणुकीचा संग्राम सुरू झाला आहे. स्वतःचे विचार बोलून दाखविले पाहिजेत, लिहिले पाहिजेत. कितीही सामान्य माणूस असला तरी त्याने यावेळी जागे राहिले पाहिजे. ' या श्री. श्री. ज. जोशी यांच्या मताशी मी सहमत आहे.

मी स्वतः निराशावादी नाही. या देशाच्या उज्वल भवितव्यावर माझी श्रद्धा आहे. त्यामुळे राजकारणापासून—सामाजिक जीवनापासून 'अलिप्त रहाणे' हा भोंगळपणा, षंढपणा व ढोंगीपणा मला पसंत नाही. 'प्रत्येक तरुणाने आपल्या विचारांची नीट सांगड घालून कुठल्यातरी राजकीय पक्षाशी आपल्या निष्ठा निगडीत करून टाकाव्यात' या मताचा मी आहे. असे झाल्याने प्रत्येक तरुण जबाबदार होतो व त्याच्या Commitments ठरतात. अशा निष्ठा ठरविताना त्या-त्या पक्षाचे संपूर्ण विचार पटावयास हवेतच असे नाही. कुठेतरी तडजोड व adjustment ही हवीच.

माझ्या या विचारांशी मी स्वतः एकनिष्ठ आहे. वयाच्या तेविसाव्या वर्षी मी स्वतःशीच विचार करून, संयुक्त समाजवादी पक्षाचे सदस्यत्व पत्करले. तसे पहाता, मी सयुक्त समाजवादी पक्षाचा क्रियाशील कार्यकर्ता नाही. त्या पक्षाचे साहित्य वाचून ते मित्रांना वाचावयास देण्यापलीकडे फारसे कार्य मी करीत नाही व त्या पलीकडे जाऊन फारसे काही करणेही मला शक्य नाही. परंतु तरुणांनी समाजवादी, विज्ञाननिष्ठ, धर्मनिरपेक्ष आणि पुरोगामी विचारसरणी अंगिकारावी व तसे वागावे असे माझे प्रामाणिक मत आहे. असे तरुण निर्माण करावयाची कुवत माझ्यात नाही; पण कोणीही असे प्रयत्न करीत असल्यास अशा व्यक्तीला सर्वतोपरी मदत करण्याची माझी इच्छा आहे व तसे प्रयत्न मी करीत आहे.

ही झाली माझ्या विचारांची पार्श्वभूमी.

कोणाला मत द्यावे असे मला विचारल्यास, नवकाँग्रेस सोडून इतर कोठल्याही

'समाजवाद मानणाऱ्या' पक्षास मत द्या असेच मी सांगेन. व्यक्ती पाहून मत देणे मला पसंत नाही. तसे पहाता, अटलबिहारी बाजपेयींबद्दल मला अत्यंत आदर आहे. राजकारणात फारच थोड्या प्रमाणात असणाऱ्या चारित्र्यवान लोकांमध्ये मी त्यांचा प्रामुख्याने उल्लेख करीन. परंतु मी त्यांना कधीच मत देणार नाही. कारण त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचे विचार, त्यांच्याच पक्षाच्या विचारसरणीच्या भारतीय मझदुर संघाने कामगार चळवळीत चालविलेली लुडबूड व केवळ साम्यवाद्यांना विरोध करण्यासाठी कामगार चळवळीत फूट पाडण्याचे त्यांनी चालविलेले कार्य मला पसंत नाही. ज्या उद्योगधंद्यात कामगार चळवळींना प्रतिष्ठा नाही अशा उद्योगधंद्यांतून आपल्या कामगार चळवळी चालविण्याऐवजी, बँक कर्मचाऱ्यांच्या प्रतिष्ठा मिळालेल्या कामगार संघटनेत फूट पाडण्याचे कार्य बी. एम्. एस्. करीत आहे. मला हा कम्युनिस्ट द्वेष पसंत नाही.

तसेच बँक राष्ट्रीयीकरणावर जनसंघाने मांडलेले विचार (कोर्टाची पायरी चढण्याची त्यांची तयारी), माजी राजे-महाराजांच्या विशेषाधिकाराविषयीची त्यांची मते मला पसंत नाहीत. आणि असा प्रतिगामी (हो प्रतिगामीच !) पक्ष जोपर्यंत त्यांच्या पाठीशी आहे तोपर्यंत श्री. अटलबिहारी बाजपेयींना मत देणे मला योग्य वाटणार नाही.

परंतु बाजपेईंनी सध्या, तडजोड व आघाडीचे जे प्रयत्न चालविले आहेत ते मला एकदम पसंत आहेत. खरे पहाता हे त्यांनी मागल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळीच करावयास हवे होते व त्यांचा कल तसा असल्याचेही त्यावेळेस बोलले जात होते. पण तेव्हा हे घडले नाही. नाहीतर एव्हाना सर्व राजकीय पक्षांचे योग्य ध्रुवीकरण होऊन देशाच्या राजकारणाची दिशाच आज बदलली असती. असो ! आता जे होत आहे ते चांगलेच म्हणावे लागेल. पण मागल्या निवडणुकीच्या वेळी 'तडजोड कदापी शक्य नाही; आम्ही सर्व जागा आमच्या हिमतीवर लढविणार' म्हणणाऱ्या त्यांच्या अनुयायांना त्यांचे हे विचार-आचार कितपत पटतील याबद्दल मला शंकाच वाटते. पण जनसंघ दुभंगणार नाही हे मात्र नक्की.

आता पुरोगामी व समाजवादी कोण ? धर्मनिरपेक्ष कोण ? हे प्रश्न उरतात. त्याकरिता अगदी साध्या कसोट्या प्रत्येक पक्षाला लावावयाच्या. त्या म्हणजे 'आजवर कामगार संघटनांना प्रतिष्ठा मिळवून गरीब कामगारांचे प्रश्न सोडवण्याकरिता ज्या ज्या पक्षांनी कार्य केले ते-ते सर्व पक्ष समाजवादी. खेड्यातून चाललेले अन्याय, भूमिहीन शेतमजूरांची पिळवणूक व फसवणूक हे प्रश्न (प्रसंगी राजकीय भांडवल करूनही) ज्या पक्षांनी चव्हाट्यावर आणले ते पक्ष समाजवादी. आणि ज्या पक्षांनी 'या देशात सार्वभौमत्व कोण्या एका धर्माचे वा धर्मियांचे, धार्मिक कायद्यांचे, किंवा ईश्वराचे नसून केवळ संसदेचेच असावे' असे वेळोवेळी प्रतिपादन केले व त्याकरिता प्रसंगी प्रखर संघर्ष दिला असे सर्व पक्ष पुरोगामी,

धर्मनिरपेक्ष व विज्ञाननिष्ठ. मला वाटते की या सरळ आणि साध्या कसोट्या लावल्या की पक्षांचे वर्गीकरण करावयास फारसे जड जाणार नाही.

एकंदरीत निवडणुकीच्या निमित्ताने वरील 'राजकीय जीवनाचा आढावा' 'वाचक–मतदारांना' उपयुक्त ठरेल. मग या सर्व राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मी पुढील निवडणूक जाहीरनामा वाचकांसमोर ठेवीन.

१. १९७१ च्या मध्यावधी निवडणुकीनंतर भारतात आघाडीचे सरकार येणे अपरिहार्य आहे व हे सरकार राष्ट्रवादी असेल किंवा नसेल हे डोळ्यात तेल घालून जनतेने पहावयास हवे, व त्या दृष्टीने उचलावयाची पावले मतदान करतानाच उचलावयास हवीत. मला अभिप्रेत असलेला राष्ट्रवाद म्हणजे 'पाकिस्तान व चीनशी युद्ध पुकारणे', हा नव्हे. या दोन्ही राष्ट्रांशी आपल्याला सलोख्याचेच संबंध ठेवावयास हवेत. युद्ध करणे आज कोणालाही परवडण्यासारखे नाही. मग मला अभिप्रेत असलेला राष्ट्रवाद म्हणजे 'आपल्या देशातील सामान्य नागरिकांचे जास्तीत जास्त हित' हा होय.

युद्ध आणि अणुबाँब यामुळे प्रश्न सुटतील हा एक गैरसमज आहे. आपल्या देशाने अणुबाँब बनवावयाची आवश्यकता नाही. व अणुबाँब यदाकदाचित बनवलाच तर तो कोणावर व कोठल्या परिस्थितीत वापरावयाचा याचा विचार व्हावयास हवा. व अणुबाँब आपण आधी टाकावयाचा की दुसऱ्या राष्ट्राने आपल्या राष्ट्रावर टाकल्यावर मग आपण त्याच्यावर टाकावयाचा याचा योग्य विचार आधी व्हावयास हवा. जर केवळ दहशत बसविण्याकरिताच अणुबाँब बनवावयाचा असेल तर आपण तो बनवू शकतो एवढे सर्व राष्ट्रांना माहीत असल्याने, अणुबाँब प्रत्यक्ष बनवण्याची आवश्यकता नाही.

३. सर्व प्रमुख व राष्ट्र-जीवनावश्यक उद्योगांचे राष्ट्रीयीकरण व्हावयास हवे, जीवनावश्यक गरजांच्या वस्तूंच्या उत्पादनाला प्राधान्य द्यावयास हवे व चैनीच्या वस्तूंचे उत्पादन यापुढे काही काळ बंद व्हावयास हवे.

४. या देशात कोण्या एका धर्माचे वा धर्मियांचे, धार्मिक कायद्याचे किंवा ईश्वराच्या एजंटांचे सार्वभौमत्व असता कामा नये. सार्वभौमत्व केवळ संसदेचेच असेल. तसेच समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मुस्लिम समाजाचे प्रबोधन व्हावयास हवे व या कामासाठी हिंदूंनी पुढाकार घ्यावयास हवा.

५. महाविद्यालयीन शिक्षण हे संपूर्णतया भारतीय भाषांमधून व्हावे व सर्व प्रांतातील महाविद्यालयात हिंदी ही सामायिक भाषा असावी. तसेच शिक्षण हे पुस्तकी शिक्षणाऐवजी जास्तीत जास्त जीवनावश्यक व्हावयास हवे.

६. संस्थानिकांचे विशेषाधिकार संसदीय मार्गांनी सर्वतोपरी प्रयत्न करून रद्द करावेत व स्वतः संस्थानिकांनी आपल्या तनख्यांची योग्य मागणी करून आपल्या राष्ट्रप्रेमाची ग्वाही द्यावी. उच्च न्यायालयाच्या एका निर्णयावरून त्यांनी शेफारून

जाऊ नये व त्यांना पाठीशी घालणाऱ्या पक्षांनी व संघटनांनी 'मूलभूत हक्काची पायमल्ली झाली' असे म्हणताना, 'मूलभूत हक्क म्हणजे विशेषाधिकार नव्हे' याचा परत एकदा विचार करावा. संस्थानिकांनीही आपल्या भावी पिढीला सरकारचे वा राष्ट्राचे मिंधे न बनवता त्यांना चांगले उद्योग निर्माण करून द्यावेत म्हणजे यापुढे तनख्यांचा प्रश्नही उद्‌भवणार नाही.

बस्स् सध्या एवढे झाले तरी खूप होईल.

□

## भारताचा झेकोस्लाव्हाकीया होईल

### फु. भि. सांकला

असे सांगितले गेले की या निवडणुकीत जर संमिश्र मंत्रिमडळ आले तर या देशाचे हाल कुत्रा खाणार नाही. एकपक्षीय मंत्रिमंडळ व्हावे म्हणून इंदिरा—कॉंग्रेसलाच मत द्यावे. परंतु परिस्थिती काय दिसते ? इंदिरा—कॉंग्रेस तरी कोठे सर्व ५२३ जागा लढविणार आहे. एवढा समर्थ पक्ष म्हणतात मग अर्धमेले प्रजासमाजवादी, अनेक गटात विभागलेले रिपब्लिकन, सीपीआय, अतिरेकी डीएमकेवाले, विषारी लीग यांचे लांगुलचालन का ? या पक्षांकरिता प्रांतोप्रांती जागा का सोडणार ? त्यामुळे जरी लार्जेस्ट सिंगल पार्टी म्हणून इंदिरा—कॉंग्रेस निवडली गेली तरी मंत्रिमंडळासाठी तिला वर सांगितलेल्या अतिरेकी, जातीयवादी व राष्ट्रद्रोही शक्तींचे सहाय्य घेऊनच मंत्रिमंडळ बनवावे लागणार हे नक्कीच. म्हणून माझ्यामते आघाडीचेच सरकार यायचे असेल तर राष्ट्रद्रोही पक्ष घटक असलेल्या आघाडीपेक्षा राष्ट्रवादी पक्षांच्या 'बड्या आघाडीचे' लोकांना प्रचंड बहुमताने निवडून द्यावे.

म्हणे जातीयवादी पक्ष या देशाचे राजकारण करू शकणार नाही. अरे, कोण जातीयवादी ? खुद्द आजचा सत्ताधारी कॉंग्रेस पक्ष हाच जातीयवादी आहे. लांब कशाला, सध्या मध्यावधी निवडणुकीच्या दृष्टीने जी संभाव्य नावे प्रसिद्ध होतात तीच वाचाना. ज्या मतदारसंघात ज्या जमातीचे बहुसंख्य मतदार तोच उमेदवार तेथे कॉंग्रेस (आधी) जाहीर करते व दुर्दैवाने व नाईलाजाने विरोधकही मग त्याच मार्गाने जातात.

आपल्या संपूर्ण विवेचनात पारगावकरांनी बंगाल व आसामबद्दल एक शब्दही खर्च केलेला नाही. त्यांच्या भारताच्या नकाशात हे दोन प्रांतच कदाचित नसतील. दुसरे काय ? आज बंगाल अक्षरशः जळतो आहे. विद्यार्थी, कार्यकर्ते, वकील, जज्ज,

कुलगुरु, मंत्र्यांचे आप्त यांना भोसकले जाते. जाळपोळ, लुटालूट तर नित्यच चालू आहे. आणि आमचे तथाकथित पुरोगामी निर्लज्ज शासन मात्र मूग गिळून गप्प बसले आहे. राज्यकर्ते म्हणून घ्यायला त्यांना लाज वाटली पाहिजे. ज्या जनतेकडून तुम्ही कर घेता त्या जनतेच्या जीवीताची व मालमत्तेच्या रक्षणाची साधी जबाबदारीही जे षंढ सरकार पार पाडीत नाही त्या सरकारला म्हणे निवडून द्या. म्हणजे राहिलेल्या संपूर्ण भारताचा लवकरात लवकर बंगाल व्हायला काय? राष्ट्रपती गाडीभर वटहुकूम काढतात. त्यांना एका वटहुकूमान्वये बंगालात आणीबाणी जाहीर करून बंगाल लष्करी गव्हर्नराच्या हातात नाही सोपविता येत व ' दिसेल त्याला गोळी घाला ' ही ऑर्डर नाही देता येत. पण राष्ट्रपती पडले पंतप्रधानाचे हुजरे व पंतप्रधान बनल्या कम्युनिस्टांच्या बाहुल्या. त्यांच्या खुर्चा टिकविण्याच्या उद्योगात बिचारी बंगाली जनता नव्हे संपूर्ण पिढी गारद होत आहे.

या देशात मुस्लिमांचा आत्यंतिक अनुनय केला जातो आहे. याचे पर्यवसान जातीय दंगलीत होत आहे. दोन पंतप्रधानांच्या २० वर्षांच्या कारकीर्दीत जेवढ्या जातीय दंगली झाल्या नाहीत तेवढ्या सध्याच्या पंतप्रधानांच्या ४ वर्षांच्या कारकीर्दीत झाल्या हे कशाचे द्योतक.

संस्थानिकांच्या तनख्याने म्हणे समाजवाद जवळ आला. ४॥ कोटी रुपयाचे तनखे वाचवून समाजवाद आणणारे महाभाग (मंत्री) स्वत: मात्र कोटयवधी रुपयाची उधळपट्टी करतात तरी ते मात्र समाजवादी व संस्थानिक म्हणे प्रतिगामी.

२३ वर्षे कॉंग्रेसच या देशात राज्य करते आहे. पूर्वी तिला बहुमतही प्रचंड होते. मग का नाही तनखे बंद केले गेले ? पण तेव्हा संस्थानिक कॉंग्रेसची बाजू घेत म्हणून ते पुरोगामी होते व ते कॉंग्रेसविरोधी राजकारणात उभे ठाकताच प्रतिगामी झाले. करारच मोडायचे तर मोडा की. नेहरु-लियाकत अली करार मोडा. ताष्कंद-करार मोडा. पण तिथे हिंमत नाही. हे आहेत फक्त घरच्या म्हातारीचे काळ.

केवळ झटपट राष्ट्रीयकरण म्हणजे समाजवाद हे कोणी सांगितले ? देशावर कोटयवधी रुपये कर्जाचा बोजा वाढतो आहे. सरकारी प्रकल्प तोटयात चालले आहेत. गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचार बोकाळला आहे. भाववाढ रोखली जात नाही. याबद्दल पारगावकर अगदी गप्प आहेत.

कायदा व सुव्यवस्थेची हमी न देणारे, कम्युनिस्टांच्या व लीगच्या आहारी गेलेले, भ्रष्टाचाराने बरबटलेले, घटनेविषयी अनादर व्यक्त करणारे, सुप्रीम कोर्टाचा अपमान करणारे केवळ घोषणावादी, नकली समाजवादी इंदिरासरकार सत्तेवर आले तर सुप्रीम कोर्ट व वृत्तपत्रे यावर गदा येईल. मूलभूत हक्क जातील. लोकशाही संपेल व भारताचा झेकोस्लाव्हाकीया होईल. म्हणून सुप्त भारतीयांनी एकमेव पर्याय म्हणून जनसंघ, सं. कॉंग्रेस, स्वतंत्र, एस. एस. पी. प्रणीत बडया आघाडीलाच विजयी करावे.

□ □ □

# महिला खोखो संघाची कर्णधार

वैद्यकीय क्षेत्रातील माझ्यासारख्या माणसाला क्रीडाक्षेत्रात समव्यवसायी व्यक्ती भेटणे हा अनेक अर्थाने आनंदाचा क्षण वाटतो. महाराष्ट्र राज्याच्या महिला खोखो संघाच्या कर्णधार प्रतिभा गोखले ह्या एम्. बी. बी. एस्. च्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थिनी आहेत ही गोष्ट त्यांना आणि क्रीडाक्षेत्राला निश्चितच भूषणावह आहे. वयाच्या एकविसाव्या वर्षी या दोन्ही क्षेत्रातील त्यांची झेपही खासच कौतुकास्पद. शिवाजी पार्क दादरच्या लोकसेना या संघातून त्यांच्या खेळाची जडणघडण झाली. लंगडीचा फायदा त्यांनाही झाला. त्याबरोबरच लोकसेनेतील रमेश वरळीकर आणि लोकमान्य विद्यामंदिर शाळेतील बाबा यादिक यांचे मार्गदर्शनही बहुमोल ठरले.

शाळेत असताना हिंद ट्रॉफी ही मानाची ट्रॉफी त्यांनी सतत तीन वर्षे जिंकली. अनेक स्थानिक व परगावचे सामनेही गाजविले. रुईया कॉलिजला असताना त्या कॉलेजचा संघ दोन्ही वर्षे अजिंक्य होता आणि पहिल्यापासूनच त्यांची मुंबई विद्यापीठ संघात निवड झाली. कित्येक वर्षे सतत अजिंक्यपद मिळवणाऱ्या इंदूर विद्यापीठाला हरवून मुंबई विद्यापीठाने जे अजिंक्यपद बंगलोरला मिळाले त्यात त्यांचा मोठा वाटा होता. नागपूरला त्या मुंबई विद्यापीठाच्या संघनायिका होत्या. कोल्हापूरला १९६६ साली राज्य क्रीडामहोत्सवात अजिंक्य ठरलेल्या मुंबई जिल्ह्याच्याही त्याच कर्णधार होत्या. हैद्राबाद, कऱ्हाड या दोन्ही ठिकाणच्या अ. भा. सामन्यात त्या महाराष्ट्र राज्याकडून खेळल्या आणि यंदा त्यांना कप्तानपदाचा मान मिळाला. पळतीच्या पहिल्याच बॅचमध्ये त्यांच समावेश हमखास असतो. पळतीमध्ये महाराष्ट्रातल्या सर्वोत्कृष्ट खेळाडूत त्या प्रमुख आहेत. भरपूर स्टॅमिना आणि पळतीला लागणारी सर्व प्रकारची कौशल्ये यांचा त्यांच्यात सुरेख समन्वय आहे. अनेक मोठ्या सामन्यातही त्या सात मिनिटाच्या डावात पाच अथवा सहा मिनिटे एकट्याच पळाल्या आहेत. खुंटावर मारण्याचे कौशल्य आपल्यामध्ये नाही



**महाराष्ट्र राज्य महिला खोखो संघाच्या कर्णधार**
**प्रतिभा गोखले**

या स्वरूपाच्या स्वतःच्या कमतरेतीचीही जाणीव स्पष्टपणे ठेवणारा खेळाडू हा मला नेहमीच चांगला खेळाडू वाटतो.

वैद्यकीय विषयाचा अभ्यास सांभाळूनही त्यांनी आपला दर्जा नियमित सरावाने टिकवला आहे. परीक्षेच्या आधी दोन महिने येईल तेवढाच काय तो खंड ! मध्यप्रदेश राज्याच्या बलाढ्य संघाशी यशस्वीपणे मुकाबला करून आपला संघ अजिंक्यपद मिळवेल अशा निर्धाराने त्यांच्या नेतृत्वाखाली सराव करणारा सराव-शिबिरातील महाराष्ट्र राज्य महिला संघामागे माझ्यासारख्या हजारो क्रीडाशौकीनांच्या शुभेच्छा उभ्या आहेत. □ □ □

---

## कोंडी फोडण्यासाठी

महाराष्ट्रात कबड्डी स्पर्धा अनेक ठिकाणी घेतात. साऱ्याचजणांना पाहिजे असतात दर्जेदार संघ आणि नामवंत खेळाडू ! नवीन होतकरू खेळाडूंना चुका सुधारण्यास आणि कौशल्य दाखविण्यास वाव मिळणार कधी ? सन्मित्र संघ त्यासाठी यंदा एक नवीन उपक्रम करणार आहे. पुण्यातील महानगरपालिकेच्या प्रत्येक वार्डातून ते एक कबड्डी संघ घेऊन अशा सत्तर वार्डातील सत्तर संघाचे ते सामने भरविणार आहेत. तर पत्रव्यवस्थेसाठी केलेल्या तीस विभागातून तीस संघ सामने औद्योगिक विभागात भरविणार आहेत. खूप होतकरू खेळाडूंना त्यामुळे मनमुराद खेळावयास मिळेल. अर्थात अशा सामन्यांना परवानगी देताना ॲसोसिएशनच्या काही नियमात फेरबदल करावे लागतील. या उपक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन ॲसोसिएशन कोणती भूमिका घेते हे पुढे येईलच.


---

## शुक्रवार ता. १५ रोजी शुभारंभ

१९६८ में राम और श्याम
१९६९ में नन्हा फरिश्ता

और अब, उत्कृष्ट कलाकृतियों के
निर्माता बी. नागी रेड्डी प्रस्तुत कर रहे हैं—
इस दशक का सर्वश्रेष्ठ पारिवारिक चलचित्र

# घर घर की कहानी



फिल्मसटर द्वारा

निर्देशन : टी. प्रकाश.राव
संगीत : कल्याणजी आनन्दजी

आपकी, हमारी, सब की अपनी कहानी।
परिवार की एक महान गाथा
सशक्त, असाधारण, अनुपम



आगाऊ तिकीट विक्री सर्व पटगृहात सोमवार ता. ११ पासून

**सेंट्रल ❊ कॅपिटॉल ❊ लोटस ❊ पॅलेस ❊ हिंदमाता**

सिटीलाईट, रूपम, स्टार (माझगाव), नंदी (वांद्रा), अंबर-संगम (अंधेरी), अनुपम (गोरेगाव), न्यू इरा (मालाड), अजंठा (बोरीवली), प्रभात (वसई), नटराज (चेंबूर), भारत (कुर्ला), प्रभात (ठाणे), उदय (घाटकोपर), प्रकाश (कल्याण), अमन-प्रभात (उल्हासनगर).

छाबडा प्रकाशन

पृष्ठ ४ वरून

वून घ्यावे लागेल. नव्या काँग्रेसला प्र. सो. पा. आणि कम्युनिस्टांचे म्हणणे नाही म्हटले तरी थोडे फार ऐकावे लागेल. आणि सर्वात महत्त्वाचा फॅक्टर म्हणजे शिवसेना. एवढ्या मोठ्या प्रमाणावर शिवसेना प्रथमच मुंबईत उतरते आहे. वामनराव महाडिकांनी विजय मिळविला त्यावरून शिवसेनेच्या सामर्थ्याची जाणीव इतर पक्षांना झालेली आहे. परंतु त्याच लढतीमध्ये शिवसेनेला जे क्षुद्र मार्जिन मिळाले आहे तेही या पक्षांच्या लक्षात आहेच. निवडणूक जिंकण्यासाठी शिवसेनेची मदत ही कुठल्याही पक्षाला अत्यंत उपयोगाची आहे. दुरंगी लढत होईल तिथे शिवसेनेच्या पाठिंब्याचा उमेदवार निवडून येण्याची शक्यता अधिक आहे. आणि जिथे तीन रंगी लढत होईल तिथे तर शिवसेनेचा उमेदवार जवळ जवळ खात्रीने येईल. त्यामुळे शिवसेनेला बरेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

मुंबईतील यांची उमेदवारी निश्चित झाली आहे असे दोघे म्हणजे सं. सो. पा. चे जॉर्ज फर्नांडिस आणि कम्युनिस्टांचे श्री. अ. डांगे. शेतकरी-कामकरी पक्षाने आतापर्यंत स्वतःचा असा उमेदवार लोकसभेसाठी उभा केला नव्हता. आता विधानसभेतील विरोधी नेते श्री. कृष्णराव धुळप कुलाबा जिल्ह्यातून लोकसभेसाठी उभे राहणार आहेत. त्यांचा प्रचारही सुरू झाला आहे.

रिपब्लिकन पक्षाची काय भूमिका आहे? रिपब्लिकन पक्ष एवढ्या गटांमध्ये फुटला आहे की कुठल्याही एका गटात आता फारशी ताकद उरली नाही. गायकवाड गट नेहमीप्रमाणे नव्या काँग्रेसशी समझोता करील. पण श्री. भैयासाहेब आंबेडकरांच्या फुटीर गटाने मुंबईतून स्वतंत्रपणे तीन जागा लढविण्याचे जाहीर केले आहे. 'न्यूसन्स व्हॅल्यू' शिवाय या उमेदवारांना दुसरी किंमत राहणार नाही.

मुंबई आणि उपनगरे मिळून सुमारे अठ्ठावीस लाख मतदार आहेत ते पाच उमेदवार निवडून देतील. मतदारसंघ असे –

## दक्षिण-मुंबई

यात कुलाबा, धोबी तलाव, गिरगाव, खेतवाडी, कुंभारवाडा, उमरखाडी हे विधानसभेचे मतदारसंघ येतात. एकूण मतदार सुमारे पावणे पाच लाख. १९६७ साली सं सो. पा. चे जॉर्ज फर्नांडिस स. का. पाटलांना पाडून या मतदारसंघातून दिल्लीला गेले होते.

## दक्षिण-मध्य-मुंबई

यात नागपाडा, भायखळा, वाळकेश्वर, माजगाव, परळ आणि शिवडी या विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. सुमारे पावणे सहा लाख मतदार आहेत. कम्युनिस्ट नेते श्री. अ. डांगे यांनी काँग्रेसचे उमेदवार हरीष महिन्द्र यांचा येथे पराभव केला होता.

## मध्य-मुंबई

वरळी, लव्हग्रोव्ह, नायगाव, दादर, माटुंगा आणि माहिम मिळून बनलेल्या या लोकसभा मतदारसंघात जवळ जवळ ५ लाख ९० हजार मतदार आहेत. अविभक्त काँग्रेसचे आर. डी. भंडारे यांनी सरळ सामन्यात आचार्य अत्रे यांना हरविले होते.

## वायव्य-मुंबई

वान्द्रा, सान्ताक्रूझ, अंधेरी, विलेपार्ले, मालाड आणि बोरीवली हे विधानसभा मतदारसंघ यात येतात. सुमारे ६ लाख ८० हजार मतदार असून मागच्या निवडणुकीत अविभक्त काँग्रेसचे आणि आता जुन्या काँग्रेसमध्ये असलेले श्री. शांतीलाल शाह यानी माजी न्यायमूर्ती आर. जी. गोखले यांचा पराभव केला होता. श्री. गोखले यांना संपूर्ण महाराष्ट्र समितीचा पाठिंबा होता. स्वतंत्र पक्षाचे श्री. मधु मेहता यांनी देखील याच मतदारसंघातून निवडणूक लढविली होती.

## ईशान्य-मुंबई

यात कुर्ला, चेंबूर, घाटकोपर, मुलुंड, ठाणे तालुका, कल्याण शहर व नजीकची खेडी या विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. मुंबईतील हा सर्वात मोठा लोकसभा मतदारसंघ. यात एकूण सात लाखावर मतदार आहेत. १९६७ मध्ये मुंबई काँग्रेसने श्री. व्ही. के. कृष्ण मेनन यांना तिकीट नाकारून श्री. स. गो. बर्वे यांना उभे केले होते. मेनन यांनी संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या पाठिंब्यावर निवडणूक लढविली आणि पराभव पत्करला. जनसंघाचे मुकुंदराव आगासकर हेही या रणात होते. बर्वे यांच्या आकस्मिक निधनानंतर काँग्रेसतर्फे त्यांच्या भगिनी सौ. ताराबाई सप्रे यांनी निवडणूक लढविली आणि श्री. मेनन यांनी दुसऱ्यांदा पराभव ओढवून घेतला. या दोन्ही वेळा शिवसेनेने काँग्रेस उमेदवारांच्या बाजूने जोरदार प्रचार केला होता.

□ □ □

---

**निवडणुका : प्रार्थमिक चित्र** पृष्ठ ४० वरून

हे खरे पण या मतदारसंघात आपणास इतर विरोधी पक्षांपेक्षा अधिक पाठिंबा आहे हे जनसंघाने ही पोटनिवडणूक लढवून सिद्ध करावयास हवे होते. रत्नागिरी मतदारसंघात काँग्रेस उमेदवार श्रीमती शारदा मुकर्जी यांनी जनसंघ उमेदवारापेक्षा ५० हजारावर अधिक मते १९६७ साली मिळविली होती. तिन्ही मतदारसघातील गेल्यावेळचे व एका पोटनिवडणुकीचे मतदान लक्षात घेता जनसंघाला या जागा जिंकणे सोपे जाणार नाही.

इतर पक्षांशी वाटाघाटी करून अंतिम यादी तयार करताना यातील काही जागा जनसंघाला अर्थातच सोडाव्या लागतील. पण आपणास जास्त जागा मिळविण्याचे उद्देशाने आपले घोडे पुढे दामटण्याचा जनसंघाचा उद्देश दिसतो.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Biweekly ) : 40 Paise : Regd. No. H-M 649

# अग्निपुत्र

वसंत पोतदार

प्रसिद्धी : २६ जानेवारी १९७१.

पूर्वग्राहकांनी आपल्या प्रती
२७ जानेवारीपासून कार्यालयातून
नेण्याची व्यवस्था करावी.

परगावच्या पूर्वग्राहकांच्या प्रती
३० जानेवारीपासून रवाना
करण्यास सुरुवात होईल.